नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र
(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

अभीष्टचिंतन



श्री. पु. भा. भावे

वर्ष २५ अंक १

मे १९७०

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २५] मे १९७० [अंक १

संपादक
शं. बा. शास्त्री

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर–१

या अंकाची किंमत : एक रुपया

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

पृष्ठ	
२	विदर्भ आणि महाराष्ट्र ग. त्र्यं. माडखोलकर
६	बौद्ध धर्माची वैदिक पार्श्वभूमी : आदिकालीन वैदिक धर्माचार–विचार (उत्तरार्ध) डॉ. सर भवानीशंकर नियोगी
१३	बर्ट्रांड रसेल नी. र. वऱ्हाडपांडे
१८	अतरौलीचा सरदार वामन इंगळे
२१	मराठी चरित्रात्मक बखर सौ. उमा देशमुख
२४	'रणांगण'- एक विचार प्रा. दिलिपसिंह बैस
३०	महानुभाव आणि मराठी भाषा प्रा. यशवंत मनोहर
३३	पुस्तक–परीक्षण शं. बा. शास्त्री
३८	पुस्तक परिचय चंद्रकांत कुळकर्णी, भास्कर नंदनवार
४१	लेख–सूची
४२	लेखक–सूची
४४	संपादकीय
	संघवार्ता

विदर्भ आणि महाराष्ट्र

ग. त्र्यं. माडखोलकर

विदर्भ आणि महाराष्ट्र यांचा संबंध प्राचीन काळी कशा प्रकारचा होता व त्यात राजकीय परिवर्तनामुळे कसकसा बदल होत गेला, याची कल्पना आज बहुतेक कुणाला नाहीच. इतकेच नव्हे, तर विदर्भाचा विस्तार पुरातन काळी केवढा होता व तो कमी कमी होत जाऊन शेवटी 'वऱ्हाड' या नावाने आज संबोधिल्या जाणाऱ्या चार जिल्ह्यांपुरता विदर्भ कसा मर्यादित होऊन गेला, याचीही माहिती फारशी कोणाला नसावी. विदर्भ हा महाराष्ट्राचा केवळ एक भाग आहे, अशीच सामान्यत: सध्या समजूत आहे. आणि तोही पुन्हा पश्चिम महाराष्ट्राच्या मानाने मागसलेला भाग ! खुद्द विदर्भातल्या लोकांचीच मुळी जिथे स्वत:विषयी अशी भावना आहे, तिथे पश्चिम महाराष्ट्रातील लोकांचा जर त्याच्याविषयी असा समज असला, तर त्यांत काय आश्चर्य ? पण, विदर्भ आणि महाराष्ट्र यांचा वैदिक काळापासूनचा इतिहास जर लक्षात घेतला, तर त्यांच्याविषयीच्या या सगळ्या कल्पना भ्रांत असल्याचे आपल्या प्रत्ययाला येईल.

विदर्भ ही महाराष्ट्राची आदिभूमी आहे. किंबहुना, विदर्भाचे विशाल स्वरूप म्हणजेच महाराष्ट्र, अशी प्राचीनांची भावना होती. वैदिक वाङ्मयात महाराष्ट्राचा उल्लेख अजिबात नाही. रामायण आणि महाभारत या ग्रंथातही नाही. उलट, बृहदारण्यकोपनिषदापासून तो महाभारतापर्यंत अनेक पुरातन ग्रंथांत विदर्भाचे उल्लेख विपुल आलेले असून, दक्षिणापथातील सुसंस्कृत आणि समृद्ध राज्य म्हणून त्याची कीर्ती अखिल भरतखंडात दुमदुमत होती. राजशेखराने आपल्या 'बालरामायण' या नाटकात असे म्हटलेले आहे की, "या किल भगवती आर्यावर्तदक्षिणापथयो: विभागरेषा,"—"विंध्यपर्वताच्या रांगांमधून वाहाणारी भगवती नर्मदा नदी ही आर्यावर्त आणि दक्षिणापथ यांच्यातील विभागरेषा आहे." विंध्यपर्वताला आपल्यापुढे नमवून आणि ही विभागरेषा ओलांडून अगस्ति ऋषि प्रथम दक्षिणेत आला; व दंडकारण्यात त्याने आर्यांची वसाहत केली. म्हणून 'दक्षिणापथपति' असा त्याचा गौरवपूर्वक निर्देश केलेला आढळतो. त्याची पत्नी लोपामुद्रा ही विदर्भराजकन्या होती. महाभारताच्या वनपर्वात राज्यभ्रष्ट झालेला नलराजा, आपली राणी, विदर्भाची राजकन्या दमयंती हिला माहेरी जाण्याची सूचना करताना, असे सांगतो की,—

एष पंथा विदर्भाणामसौ गच्छति कोसलान् ।
अत:परंच देशोऽयं दक्षिणे दक्षिणापथे ॥

"हा मार्ग विदर्भाकडे आणि हा कोसलाकडे जातो. दक्षिणेला असलेल्या दक्षिणापथातला हा देश यापुढे सुरू होतो." महाभारतातील या निर्देशावरून विदर्भ आणि कोसल यांचे प्राचीन काळापासून असलेले साहचर्यही सूचित होते. विदर्भ, कोसल, अश्मक, अपरांत, भोजवर्धन, ऋचीक, कुंतल इत्यादी दक्षिणापथातील देशांचे आणि कुंडिन, शूर्पारक, चिंचिनी, पैठण, नाशिक, नागपूर इत्यादी नगरांचे उल्लेख पाणिनि, गुणाढ्य, वररुचि, बौधायन, कौटिल्य, पतञ्जलि प्रभृति ख्रिस्तपूर्व ग्रंथकारांनी केलेले आहेत. पण महाराष्ट्राचा उल्लेख मात्र केलेला नाही.

महाराष्ट्राचा पहिला उल्लेख वररुचीने, आपल्या 'प्राकृतप्रकाश' या प्राकृत भाषांच्या व्याकरणग्रंथातील "शेषं महाराष्ट्रीवत्" या सूत्रात, केलेला आहे, असे म्हणता येईल. कारण, हा उल्लेख महाराष्ट्र देशाचा नसून, 'महाराष्ट्री' या प्राकृत भाषेचा आहे. ही 'महाराष्ट्री' भाषा महाराष्ट्राची नसावी, असा आक्षेप काही पाश्चात्य संशोधकांनी घेतलेला असल्यामुळे, हा भाषाविषयक उल्लेख महाराष्ट्र देशाचा निदर्शक आहे, असे

निश्चयाने म्हणणे कठीण वाटते. पण, त्यावरोबरच असे विधान करावयाला मात्र हरकत नाही की, वररुचीच्या काळी, म्हणजे ख्रिस्तपूर्व चवथ्या शतकात, 'महाराष्ट्र' हा शब्द प्रचलित झालेला होता. मग तो भाषानिर्देशक कां असेना! उलट, दंडीने आपल्या 'काव्यादर्शा'त "महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदु:" आणि लक्ष्मीधराने आपल्या 'षड्भाषाचंद्रिके'त "तत्र तु प्राकृतं नाम महाराष्ट्रोद्भवं विदु:" अशीं 'महाराष्ट्री' ही महाराष्ट्र देशाचीच भाषा असल्याबद्दल निश्चित विधाने केलेलीं असल्यामुळे, वररुचीच्या काळी 'महाराष्ट्री' या भाषेप्रमाणेच महाराष्ट्र हा देशही अस्तित्वात आलेला असावा, असे गृहीत धरावयाला शंका वाटत नाही. 'प्राकृतप्रकाश'च्या पाठोपाठ वायु, मार्कंडेय, ब्रम्ह, मत्स्य इत्यादी पुराणांतूनही महाराष्ट्राचे स्पष्ट निर्देश आलेले आहेत. इतिहासकालातला महाराष्ट्राचा पहिला उल्लेख चवथ्या शतकातील शकनृपति श्रीधरवर्मा याच्या एरण येथील यष्टिलेखात दृष्टीस पडतो. या लेखात त्याचा सेनापती सत्यनाग याने आपला स्वत:चा उल्लेख 'माहाराष्ट्र' म्हणजे महाराष्ट्रीय या शब्दाने केलेला आहे. त्याचप्रमाणे, सीलोनमधील 'महावंश' या पाचव्या शतकातील बौद्ध ग्रंथात, सम्राट् अशोकाने धर्मोपदेशार्थ ज्या निरनिराळचा देशांत स्थविर पाठवले असल्याची माहिती दिलेली आहे, त्या देशांच्या नामावलीत 'महारठ्ठ' म्हणजे 'महाराष्ट्र' या देशाचा उल्लेख आहे. मात्र त्यावरोबरच, पुढे कालांतराने महाराष्ट्रात समाविष्ट झालेल्या 'वनवासी' आणि 'अपरांत' या दोन देशांचा स्वतंत्र उल्लेख त्याने त्यात केलेला आहे, ही गोष्टही लक्षात घ्यावयाला हवी. या नंतरच्या काळातील वराहमिहिर, वात्स्यायन, फाहियान, हुएनत्संग प्रभृति स्वदेशी आणि विदेशी ग्रंथकारांनीही महाराष्ट्राचे उल्लेख विपुल केलेले आढळतात.

तथापी, हे सगळे जे महाराष्ट्राचे उल्लेख ख्रिस्तपूर्व चवथ्या शतकानंतर निर्माण झालेल्या ग्रंथांतून आलेले आहेत, ते निर्देश आज जो महाराष्ट्र आपल्या डोळचांपुढे आहे, त्याला फारसे लागू पडत नाहीत, ही गोष्ट ध्यानात घ्यावयाला हवी. इतकेच नव्हे, तर दहाव्या शतकापर्यंत ज्या अनेक संस्कृत लेखकांनी आपल्या काव्यनाटकादी ग्रंथांतून महाराष्ट्राचे निर्देश केलेले आहेत, त्यांची भावना विशाल विदर्भ म्हणजेच महाराष्ट्र अशी होती, असे दिसते. आठव्या शतकातील मुरारी कवीने, आपल्या 'अनर्घराघव' या नाटकात, अमरावती जिल्ह्यातील आजच्या कौंडिण्यपूर या पडित गावाचे वर्णन—"इदमग्रे महाराष्ट्रमण्डलैकमण्डनं कुंडिनं नाम नगरम्"--"हे महाराष्ट्र देशाचे एकमेव भूषण असलेले कुंडिन नावाचे नगर!" अशा गौरवयुक्त शब्दांनी केलेले आहे. यावरून असे अनुमान जर काढले की, कुंडिनपूर ही त्या काळात महाराष्ट्रमंडलाची राजधानी होती, तर ते अतिशयोक्त किंवा अयुक्तिक ठरणार नाही. पण, महाराष्ट्र म्हणजे विशाल विदर्भ ही जाणीव जर अधिक सुंदरतेने कोणत्या संस्कृत ग्रंथात व्यक्त झालेली असेल, तर ती राजशेखर या दहाव्या शतकातील वैदर्भीय कवीच्या 'बालरामायण' या नाटकात. रावणवधानंतर प्रभु रामचंद्र हा, सीता आणि लक्ष्मण यांच्यासह, पुष्पक विमानात बसून, लंकेहून अयोध्येला परत येत असता, त्याला विमानातून वाटेतील देश दाखवीत असलेला सुग्रीव म्हणाला, "भरताग्रज, अयमग्रे महाराष्ट्रविषय:"—"हे भरताग्रजा, हा पहा पुढे महाराष्ट्र देश." त्यावरोवर रामाने सीतेला म्हटले, "सोऽयं सुभ्रु पुरो विदर्भविषय: सारस्वती-जन्मभू:",--"सारस्वताची केवळ जन्मभूमीच असा हा विदर्भ देश पहा." तेव्हा, सीतेने लगेच त्याला आठवण दिली,—"यत्रोत्पन्ना मे पितामहश्वशुरस्य गृहिणी इन्दुमती",--"हो, या देशातच माझ्या आजेसासूबाई इंदुमती यांचा जन्म झालेला होता." राजशेखराच्या 'बालरामायणा'तील हे वर्णन विदर्भ आणि महाराष्ट्र यांच्या अभिन्नतेचे निदर्शक आहे. राजशेखराचा समकालीन कवी त्रिविक्रम याने तर आपल्या 'नलचम्पू' या काव्यात विदर्भाचे असे वर्णन केलेले आहे की,—

> **वीरपुरुषं तदेतद्वरदातटनामकं महाराष्ट्रं**
> **दक्षिणसरस्वती सा वहति विदर्भा नदी यत्र**

"तेच हे वीरपुरुषानी समृद्ध असलेले वरदातट नावाचे महाराष्ट्र—दक्षिण भारतातील केवळ सरस्वतीच अशी विदर्भा नदी या प्रदेशातून वाहाते."

विदर्भ म्हणजेच महाराष्ट्र अशी जी ही कल्पना अनेक दाक्षिणात्य आणि वैदर्भीय कवींच्या काव्यातून व्यक्त झालेली आहे, तिच्याबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण, प्राचीन काळी विदर्भाचा विस्तार नर्मदेपासून गोदावरीपर्यंत होता; व मराठवाडा आणि

खानदेश यांचा समावेश त्यात होत असे. त्यामुळे, विदर्भाचे वेदकालापासून दंडकारण्यापर्यंत विस्तारत गेलेले हे विशाल आणि भव्य स्वरूप म्हणजेच खरोखरी महाराष्ट्र, अशी लोकांची प्राचीन काळी साहजिकच भावना होऊन गेलेली होती. संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांची केंद्रेही, श्रीशिवाजीमहाराजांचा उदय होईपर्यंत, विदर्भातच होती. यादवांच्या काळात देवगिरी आणि पैठण ही संस्कृत वाङ्मयाची प्रमुख केंद्रे होती; व मराठी भाषेतील आज तरी आद्य काव्यग्रंथ मानला जात असलेला मुकुंदराजाचा 'विवेकसिंधु,' हा वैनगंगेच्या तीरी अंबानगरीत म्हणजे अंभोरे येथे रचला गेला, असा समज त्या ग्रंथातील ओवीवरून झालेला आहे. पण, हा समज वादग्रस्त आहे असे मानले, तरी देखील अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर हे महानुभाव पंथाचे धर्मपीठ आणि त्या पंथाच्या वाङ्मयाचे केंद्रस्थान असल्यामुळे, मराठी वाङमयाचा उगम आणि उन्मेष हा विदर्भातच झाला, हे मान्य करावे लागेल. राजसत्तेबरोबर साहित्य आणि संस्कृति यांची केंद्रेही बदलत जातात, अशी इतिहासाची साक्ष आहे. बाराव्या शतकात मराठी वाङमयाचे केंद्र हे अंबानगरी आणि रिद्धपूर या दोन ठिकाणी होते; व या दोन्ही केंद्रात निर्माण होणाऱ्या वाङ्मयाला राजाश्रय होता, असे साधार म्हणता येईल. तेराव्या शतकात दक्षिणेतील हिंदु राज्यांचा उच्छेद झाल्यावर मराठी भाषेचे राजाश्रित असे केंद्र कुठेच उरले नाही. तथापि, प्राचीन काळापासून 'दक्षिण-काशी' म्हणून गाजलेल्या गोदातीरावरील पैठण या तीर्थक्षेत्रात, संस्कृत वाङमयाप्रमाणेच, मराठी वाङमयाचेही केंद्र मुसलमानी राजवटीत येऊन वसले. हे केंद्र, श्रीशिवाजीमहाराजांचा उदय होईपर्यंत, पैठण आणि त्याच्या भोवतालचे गोदावरीचे परिसर यात होते. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात वर्धिष्णु मराठी राजसत्तेचा आश्रय मिळाल्यामुळे ते केंद्र जे पुण्यास गेले, ते नंतर तेथेच दृढमूल होऊन बसले. हा सगळा इतिहासाचा क्रम लक्षात घेतल्यावर, असे म्हणावयाला शंका वाटत नाही की, वैदिक कालापासून तो सोळाव्या शतकापर्यंत नर्मदेपासून गोदावरीपर्यंत पसरलेला प्राचीन विदर्भ हाच मराठी संस्कृति आणि साहित्य यांचे माहेरघर होता. त्याचप्रमाणे, संस्कृत साहित्याचे आणि इतरही नानाविध शास्त्रांचे माहेरघर! विदर्भ म्हणजेच महाराष्ट्र अशी जी कल्पना अकराव्या शतकापर्यंत संस्कृत साहित्यात पुन:पुन्हा प्रकट झालेली आहे, ती याच कारणामुळे. संस्कृत साहित्यशास्त्रात वैदर्भी रीतीला प्राप्त झालेले अनन्य महत्त्वही विदर्भाच्या या प्राचीन विस्ताराच्या आणि वैभवाच्या प्रभावाचे निदर्शक आहे, असे म्हणता येईल.

विदर्भाच्या या वैभवाला आणि महत्त्वाला सहाव्या शतकापासून उतरती कळा लागलेली दिसते. इ. स. च्या पहिल्या शतकापासून गोदावरी आणि कृष्णा यांच्या दुआवात सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव प्रभृति जी अनेक पराक्रमी राजघराणी उदयाला आली, त्यांनी आपली साम्राज्यसत्ता दक्षिणेस कावेरीपासून तो उत्तरेस नर्मदेपर्यंत आणून भिडवण्याचा प्रयत्न केला. याच काळात त्यांच्या राजधान्या पैठण, नंदिवर्धन, वत्सगुल्म, बदामी, अचलपूर, देवगिरी इत्यादी शहरी वसत गेल्या; व विदर्भ, अश्मक, अपरांत, कुंतल, कोकण, गोमंतक, वनवासी इत्यादी निरनिराळे विभाग त्यांच्या साम्राज्यात समाविष्ट होऊन, त्यातूनच आजच्या महाराष्ट्राचे स्वरूप आकाराला आले. म्हणूनच, सहाव्या शतकातील चालुक्य सम्राट् सत्याश्रय पुलकेशी याच्या एहोळी येथील शिलालेखात त्याने केलेल्या महाराष्ट्रविजयाचे असे वर्णन केलेले दृष्टीस पडते की,—

अगमदधिपतित्वं यो महाराष्ट्रकाणाम् ।
नवनवतिसहस्रग्रामभाजां त्रयाणाम् ।।

"नव्याण्णव हजार गावे असलेल्या तीनही महाराष्ट्रकांचे आधिपत्य त्या सम्राटाने संपादन केले." ही तीन महाराष्ट्रके कोणती, हे आज निश्चित करणे कठीण आहे. कारण, सह्याद्री आणि सातपुडा या पर्वतराजींनी विभागलेल्या महाराष्ट्राचे आज विदर्भ, मराठवाडा, देश आणि कोकण हे चारच भाग जरी आपल्या डोळ्यांपुढे असले, तरी प्राचीन काळी अपरांत, अश्मक, कुंतल, वनवासी, गोमंतक इत्यादी निरनिराळ्या नावांनी त्याचे अनेक भागोपभाग प्रसिद्ध होते. त्यामुळे, हे वर्णन करताना सम्राट् सत्याश्रय पुलकेशी याच्या स्तुतिपाठकाला तीन महाराष्ट्रके या शब्दप्रयोगाने त्याला शोभणारे महाराष्ट्राचे कोणते तीन मुख्य भाग निर्देशित करावयाचे होते, हे समजत नाही. तथापि, या शिलालेखावरून तोपर्यंत विदर्भ, नवराष्ट्र, देवराष्ट्र

इत्यादी अभिधानांनी ओळखल्या जात असलेल्या या देशाला 'महाराष्ट्र' हे एकत्वदर्शक निश्चित नाव सहाव्या शतकात मिळाले, ही गोष्ट सिद्ध होते, यात मात्र शंका नाही. त्या शिलालेखातील हे महाराष्ट्राचे परंपरागत वर्णन डोळ्यांपुढे असल्यामुळेच वहुधा, गुर्जर शिववास या पंधराव्या शतकातील महानुभाव ग्रंथकाराने, स्थळपोथीवरील आपल्या भाष्यात, 'तीन भाग मऱ्हाठ' असा महाराष्ट्राचा निर्देश केलेला असावा.

सम्राट् सत्याश्रय पुलकेशी याच्या राजवटीत, वैनगंगेपासून कृष्णेपर्यंत पसरलेल्या महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांचे एकीकरण होऊन, 'महाराष्ट्र' हे जे प्रतिष्ठादर्शक नाव सहाव्या शतकात रूढ झाले, तेच नंतर सतराव्या शतकात श्रीशिवाजीमहाराजांनी स्वराज्यस्थापना केल्यावर अखिल भरतखंडात गाजले. तरीदेखील विदर्भ, मराठवाडा, खानदेश, घाट, कोकण, गोवा इत्यादी महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागोपभागांची भिन्न नावे अजूनही प्रचारात आहेतच; व ती नावे त्या त्या भागाची पृथक्ता आणि वैशिष्ट्य ही दोन्ही सूचित करतात. किंवहुना, श्रीसमर्थांनी अफजलखानाच्या वधानंतर हर्षभराने गायिलेल्या स्वप्नसूक्तात 'आनंदवन-भुवन' या गौरवपूर्ण अभिधानाने गोदावरी आणि कृष्णा यांच्या दुआवातील प्रदेशाचा जो जयजयकार केलेला आहे, त्यामुळे त्या प्रदेशालाच पुढे महाराष्ट्र म्हणून संवोधण्याची प्रथा पडली; व सतराव्या शतकातील महानुभाव कवि डिंभ कृष्णमुनी याने आपल्या 'ऋद्धपुर-महात्म' या काव्यग्रंथात केलेल्या महाराष्ट्राच्या—

विंध्यांद्रीपासौनि दक्षिण दिशेसी ।
कृष्णानदीपासौनो उत्तरेसी ॥
झाडीमंडळापासौनि पश्चिमेसी ।
महाराष्ट्र बोलीजे ॥

या विशाल व्याख्येचा संकोच होत जाऊन आणि विसर पडून, पश्चिमेकडील दहा जिल्ह्यांच्या छोटया भागाला 'महाराष्ट्र' हे नाव मिळाले ! महाराष्ट्राची व्याप्ती, स्वरूप, संस्कृती आणि वैशिष्ट्य यांच्याविषयी जितके अभिमानगर्भ यथार्थ आकलन महानुभाव पंथाचे प्रवर्तक आणि ग्रंथकार यांना होते, तितके ते महाराष्ट्रातील इतर पंथांचे प्रवर्तक आणि ग्रंथकार यांना नसावे, असे म्हटल्यास ते अनुचित आणि अन्यायकारक होणार नाही. त्यामुळेच वहुधा, मराठशाहीच्या उत्तरकाळात मराठ्यांचे साम्राज्य जरी कावेरीपासून गंगेपर्यंत पसरले, तरी सगळा मराठीभाषी प्रदेश स्वराज्यात आणण्याची कल्पना काही एकाही मराठी मुत्सद्याच्या मनात डोकावली असेल, असे वाटत नाही. त्याचा एक भयानक दुष्परिणाम असा झाला की, नागपूर प्रांताचे तीन चार जिल्हे सोडल्यास, प्राचीन विदर्भाचे वऱ्हाड, मराठवाडा आणि खानदेश हे तिन्ही भाग, देवगिरीचे यादव साम्राज्य नष्ट झाल्यावर, गेली सातशे वर्षे वहुतेक पारतंत्र्यातच राहिले. सतराव्या शतकात श्रीशिवाजी महाराजांच्या पुण्यप्रतापाने पश्चिम महाराष्ट्राच्या बऱ्हंश भागाला स्वराज्य लाभल्यामुळे, आधुनिक इतिहासात त्याला महत्त्व प्राप्त झाले आणि त्याची प्रगतीही होत गेली, हे निस्संशय !

तथापी, नर्मदेपासून कृष्णेपर्यंत पसरलेल्या महाराष्ट्र राज्याच्या या सर्व भागोपभागात विदर्भ हा अत्यंत प्राचीन असून, मराठी भाषा आणि संस्कृती यांचा तो वैभवशाली आदिभूमी होता, हे विसरून चालणार नाही. वैदिक कालापासून दहाव्या शतकापर्यंत विदर्भ हा सर्वच बावतीत महाराष्ट्रमंडळात अग्रेसर होता. नंदिवर्धन, अंवानगरी, कुंडिनपूर, रिद्धपूर, देवगिरी इत्यादि त्याच्या त्या प्राचीन काळातल्या काही राजधान्या आज उध्वस्त स्थितीत रीठ होऊन पडलेल्या असल्या, तरी त्यांची नावे साहित्यात आणि इतिहासात चिरंतन होऊन गेलेली आहेत. यादव साम्राज्याच्या विनाशानंतर सातशे वर्षांनी विदर्भ दास्यमुक्त आणि महाराष्ट्राशी निगडित होऊन आज पुन्हा प्रगतीच्या मार्गाला लागलेला आहे. ही त्याची प्रगती विदर्भ आणि महाराष्ट्र या दोघांच्याही एकात्मतेला, दृढतेला आणि उत्कर्षाला पोषक होवो, येवढीच सदिच्छा !

बौद्धधर्माची वैदिक पार्श्वभूमी

आदिकालीन वैदिक धर्माचार–विचार

पुरोहितांचा काळ (उत्तरार्ध)

—डॉ. सर भवानीशंकर नियोगी

जिज्ञासू मनाला ह्या जगताच्या उत्पत्तिकर्त्याचा ठाव लागणे शक्य झालेले नव्हते, हे आपण आतापर्यंत पाहिले आणि, प्रजापती अथवा विश्वकर्मा ह्याची कल्पना मनात साकार झाल्यानंतरही त्याच्यापुढे अडचण उभी होती ती ही की, ही निर्मिती झाली कशी? आणि झाली ती कोणत्या सामुग्रीच्या साहाय्याने? त्याने ह्या जगाची उत्पत्ती कशी व कशाने केली? ह्याचे उत्तर शोधण्यासाठी आपली निश्चितकर्मे नियमितपणे करीत असलेल्या 'देवांशी'च त्यांना जवळीक साधावी लागली. पण त्यांचा विचार त्याच्याही पलीकडे गेला. आता ते अप्रत्यक्ष, अमूर्त कल्पनेच्या क्षेत्रात अधिक पुढे शिरले. एका चिरंतन, अपरिवर्तनशील चैतन्यदायी शक्तीचे आस्तित्व त्यांच्या मनापुढे खेळू लागले. त्यांच्या ज्ञानेंद्रियांना या शक्तीचे उपयुक्ततावादी स्वरूप प्रतीत होऊ लागले. अशा प्रकारे, अग्नीचे वर्णन 'सत्यनिष्ठ', म्हणून केलेले आपल्याला आढळते. इंद्राला त्यांनी 'सत्य–स्वरूप' म्हणून म्हटले, अश्विनींना 'सत्यवान' म्हटले, आदित्याला 'सत्यभूत' म्हटले आणि अशाच प्रकारे 'सत्यसूनु', 'सत्यधर्म' वगैरे नामे अस्तित्वात आली. सत्याशी ऋताची म्हणजे शाश्वत अशा वैश्विक व्यवस्थेची सांगड घालण्यात आली. सत्याबद्दलची कल्पना ते स्थाणु–गतिहीन आहे अशी, आणि ऋताबद्दलची कल्पना ते गतिशील आहे अशी ठरली. ऋताचे निषेधपर रूप अनृत आणि त्याचे प्रेरणात्मक रूप धर्म मानले गेले–हा धर्म म्हणजे नीतिशास्त्रात आलेली खरे, न्याय आणि चांगलेपणाची कल्पना, सत्य पृथ्वीला ज्याप्रमाणे धारण करते त्याप्रमाणे सूर्य स्वर्गाला धारण करते. (ऋग्वेद १०।८५।१)

पृथ्वीवर जन्मास आलेल्या मनुष्यप्राण्याला आपल्या अस्तित्वासाठी या महाभूतांवरच अवलंबून राहावे लागत असल्याकारणाने त्यांनी त्यांची प्रार्थना करावी यात वावगे काही नाही. पण या प्रार्थनांच्या मुळाशी जे उद्दिष्ट होते ते एका सूक्तात आले आहे. ते असे– "आम्हाला शाश्वत धर्माच्या मार्गाने सर्व दुःख–कष्टाच्या पलीकडे ने!" याप्रमाणे देवाची प्रार्थना करून आणि त्यांना पृथ्वीवर येण्यासाठी पाचारण करून, त्यांना बसावयास आसन देऊन, खाद्य–पेयादिकांच्या नैवेद्याने त्यांना संतुष्ट करून प्रसन्न करून घेणे मनुष्याला आवश्यकच होते. संपत्ती आणि सुख प्राप्त होण्यासाठी निरामय व प्रदीर्घ आयुष्यासाठी, शंभर शरद्ऋतु पाहावयाला मिळावे यासाठी (शरदां शतम्) धुक्याप्रमाणे शरीर–सौष्ठव उडवून लावणाऱ्या वार्धक्याचे ओझे येऊ नये यासाठी, पुत्रप्राप्तीसाठी, मित्रपरिवारात आणि संपूर्ण समाजात मानाचे स्थान प्राप्त व्हावे यासाठी, सर्व शत्रूंपासून आणि संकटांपासून रक्षण होण्यासाठी (घरात आणि बाहेरही), प्रत्येक शत्रूवर विजय मिळून त्याच्याकडून भरभक्कम लूट मिळण्यासाठी (मग ते आर्य असोत किंवा रानटी 'दस्यु' असोत), या प्रार्थना असत. आणि सर्वांपेक्षा अधिक म्हणजे गृत्समद इंद्राला कळकळून प्रार्थना करतो,—"हे देवा, सर्वोच्च आणि सर्वोत्कृष्ट असे हे भांडार मला प्राप्त होऊ दे,—

"हे इंद्रा, तू आम्हाला उत्कृष्ट संपत्ती दे. ज्ञान आणि सामर्थ्याचा भाग्यशीलपणा दे. धनाची समृद्धी, शरीराचे आरोग्य, वाणीचा मधुरपणा, आणि चांगले दिवस आम्हाला दे."(ऋग्वेद २-२१-६, चित्रावशास्त्री)

इंद्र, वरुण आणि अदितीला उद्देशून म्हटलेली स्तोत्रे नमूद करून मी हा भाग संपवितो. इंद्र म्हणजे युद्धाची देवता, सर्व भूतांच्या युद्धात नेहमीच विजयी होणारा, असे पूर्वीच सांगितले आहे.

"हे इंद्रा, तुला विनयपूर्वक अत्यंत स्तवन करणाऱ्या भक्तास तू द्यावापृथ्वीत प्रतिष्ठा देतोस...... हे इंद्रा, ज्ञाता असा तू आमचे स्तोत्र ऐकण्याकरिता ये. सोम जर काढला नाही तर इंद्राला आनंद होत नाही. सोम काढला पण स्तोत्रे म्हटली नाहीत तरी इंद्राला आनंद होत नाही."

(ऋग्वेद ७, २८–३, २६–१ चित्रावशास्त्री)

—आणि मग इंद्राला वृषभांचे बलिदान आणि सोमरस हवा, हे ओघाने आलेच.

"ह्या वरुणाने अरण्यावर आकाश, घोड्यांत सामर्थ्य, आणि नद्यांत पाणी उत्पन्न केले. अंतःकरणात कर्तृत्वबुद्धी, पाण्यात अग्नी द्युलोकात सूर्य आणि पर्वतावर सोम उत्पन्न केला." (ऋग्वेद ५, ८५–२, चित्राव.)

"हे जे आकाशात उंच ठिकाणी स्थित असलेले ऋक्ष (नक्षत्रे) दिसत आहेत, ते दिवसास कोठेतरी जातात, आणि तेजःपुंज असा चंद्रमा रात्रीच्या वेळी येतो. वरुणाचे नियम कोणी मोडीत नाही."

(ऋ. १, २४–१० चित्राव.)

"ज्याने आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांचा मार्ग जाणला आहे, ज्याने समुद्रात प्रवास करणाऱ्या नौकांचा मार्ग जाणला आहे... . असा तो सामर्थ्यसंपन्न आणि नियमशील वरुण स्वगृही बसून सर्व साम्राज्य चालवीत आहे." (ऋ. ५, २५–७–१० चित्राव.)

सातव्या मंडलात सुविख्यात असे वशिष्ठ–प्रार्थना –स्तोत्र येते ते येणेप्रमाणे—

"हे वरुणा, दिव्य विभूतीसंबंधी आम्हा लोकांनी जी काही द्रोहबुद्धी धरली असेल, जो काही अज्ञानाने धर्म टाकला असेल, त्या पापामुळे हे देवा, तू आमचा नाश करू नकोस." (ऋ. ७, ८९–५ चित्राव.)

"हे वरुणा, आमच्या वाडवडिलांपासून किंवा आमच्या स्वतःकडून जे दोष घडले असतील, त्यांपासून तू आम्हाला मुक्त कर. हे राजा वरुणा, दाव्यापासून वासराला सोडावे त्याप्रमाणे वसिष्ठाला तू मुक्त कर. हे स्वतःचे सामर्थ्य नव्हे तर तो दुर्वासना कारण आहे. दारू, क्रोध, फासे आणि अविचार हे दुर्वासना उत्पन्न करणारे आहेत." (ऋ. ७, ८६–५–६, चित्राव.)

"हे उत्कृष्ट संपत्तियुक्त राजा वरुणा, मी त्या मृत्तिकेच्या घरात जाऊ नये. दया कर बाबा, दया कर. पाण्यात असूनही मी तान्हेलेला आहे. तरी स्तोत्यावर कृपा कर, हे धनवंता, कृपा कर."

(ऋ. ७, ८९–१–४, चित्राव.)

आणि शेवटी अदितीला उद्देशून म्हटलेले स्तोत्र असे—

"अदिती हाच इहलोक, अदिती हेच अंतरिक्ष, तीच माता, तोच पिता, तोच पुत्र होय. सर्व देवही अदितीच होय. पंचजनही तीच होय. भूत आणि भविष्य अदितीच होय." (ऋ. १, ८९–१०, चित्राव.)

आतापर्यंत जो आढावा घेतला त्यावरून असे दिसून येते की, त्या काळात ऋषींनी निसर्गाकडे पाहिले ते काव्यदृष्टीने. हे सारे विश्व देवाने निर्मिलेले काव्य आहे (विश्वं देवस्य काव्यम्) असे त्यांनी पाहिले व म्हटले. पण विश्वाचा उत्पत्तिकर्ता कोण, आणि त्याने याची उत्पत्ती कशी आणि कशाने केली, याचा पत्ता काही त्यांना लागला नाही. शेवटी त्यांनी निष्कर्ष काढला तो हा की, या प्रश्नांचा उलगडा कदाचित् सातव्या सर्गात अधिष्ठित असलेल्या त्यालाही ठाऊक नसेल. ('यदि वा न वेद' असे नासदीय सूक्तात म्हटले आहे, तसेच.)

मग आता काय करायचे ? तेव्हा पुरोहित पुढे आले. म्हणायला लागले, कवींनो, निसर्ग–सृष्टीचे गूढ उकलण्याचा तुमचा हा खटाटोप पुरे झाला. आता तुम्ही रचलेल्या प्रार्थना–स्तोत्रांचा मंत्र म्हणून आम्हाला उपयोग करू द्या. आम्ही त्या देवांना आवाहन करू, खाद्यपेयादी नैवेद्याने त्यांना संतुष्ट करू आणि आमच्या इच्छा पूर्ण करावयास अशा प्रकारे आम्ही त्यांना उद्युक्त करू. अशा रीतीने यज्ञ–संस्थेचा उदय झाला, भारतात वैदिक समाजाचा, वैदिक संस्कृतीचा आणि वैदिक सभ्यतेचा पाया घातला गेला आणि त्या संस्कृतीने परिस्थितीचे भले–बुरे तडाखे झेलीत झेलीत राम, कृष्ण आणि बुद्धापासून तो रामकृष्ण आणि गांधींपर्यंत विभूतींना येथे जन्म दिला.

ह्या विषयाचा व्याप फार विशाल आहे. त्याचे सविस्तर विवेचन "ब्राह्मण" ग्रंथांच्या साहित्यात आले आहे. जगातील एका अतिश्रेष्ठ मानव-वंशाच्या धार्मिक आणि तत्त्वचिंतनाच्या उत्क्रांतीच्या संदर्भात त्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

पुरोहितवर्गाला अतींद्रिय स्वरूपाच्या प्रश्नाशी काही करावयाचे नव्हते. ते लोक म्हणजे संसारी जीव. 'देव' म्हणून संबोधल्या जाणाऱ्या निसर्ग-शक्तींच्या कार्यपद्धतीशी काय तो त्यांचा संबंध; कारण ह्या कारभारावरच मनुष्याचे पृथ्वीवरील जीवन अवलंबून आहे. ह्या अवस्थेत निसर्गांच्या वस्तूंना किंवा शक्तींना देवस्वरूप मानले गेले, आणि भाषेत त्यासाठी योग्य शब्द नसल्याकारणाने त्यांना प्रत्यक्ष सचेतन जीवाचे रूप प्राप्त झाले. त्या शक्तीच्या वर्णनासाठी कवीने तयार केलेला शब्द आता त्या देवतेचे नाम (नाव) बनले. त्या शक्तीचे गुणधर्म किंवा तिच्याकडून होणारे कार्य व्यक्तिरूप बनले. आणि जे गुणधर्म किंवा वर्णन निव्वळ काव्यात्म होते ते आता त्या देवतेचा व्यक्तिगत इतिहासच मानले जाऊ लागले. यज्ञ-विधीत पुरोहितांना सर्वप्रथम आणि सर्वप्रमुख असे स्थान मिळाले. कारण, युद्धात विजय मिळून यथेष्ट लूट हाती येणे, धन-धान्याची आणि पशूंची समृद्धी, संपत्ती, आणि पुत्रांची प्राप्ती अशासारख्या सर्व इच्छा त्याच्या मंत्र-ब्रह्माच्या सामर्थ्यामुळेच पूर्ण होऊ शकत. उदाहरणार्थ, एका ऐतिहासिक वशिष्ठ-सूक्तात असे म्हटले आहे,— "यज्ञ न करणाऱ्या दहा एकत्र झालेल्या राजांना सुदासावर विजय मिळविता आला नाही." दिवोदस, त्याचा पुत्र सदस आणि यदु राजा यांच्यासारख्यांच्या दानशूरतेची स्तुती करणारा "दान-स्तुति" नावाचा जो अभ्यासग्रंथांचा विभाग आहे, त्याचे खरे महत्त्व याच कारणामुळे आहे. दक्षिणा दिली जात असे ती अश्वांच्या, धेनूंच्या, सुवर्णांच्या आणि वस्त्रादिकांच्या स्वरूपात.

आकाशात आणि अंतरिक्षात असणाऱ्या देवांपर्यंत जाऊन पोचण्याचा मार्ग कवीने खुला करून दिला, हे वर सांगितलेच आहे. आकाश आणि अंतरिक्ष यात घडणाऱ्या घटनांची पुनरावृत्ती यज्ञाच्या रूपाने पृथ्वीवर करणारे पुरोहित होते. काही असंस्कृत लोकांमध्ये आजही असा समज पसरलेला दिसतो की, जर एखादी गोष्ट घडून यावी अशी माणसाच्या मनात अत्यंत तीव्र इच्छा असेल तर, त्या गोष्टीची प्रतिकृती तयार करून माणसाला ती घटना घडवून आणता येते. आजच्या राजकारणात आपल्याला नको असलेल्या व्यक्तींचे पुतळे करून ते जाळण्याचे प्रकार आपण पाहतोच. 'भानामती'सारख्या जादूटोण्यात मोडणारा हा एक प्रकार आहे. पण दस्यूंच्या समजुतीप्रमाणे ही क्रिया जर वाईट गोष्टी घडवून आणण्याच्या बाबतीत यशस्वी ठरते असे मानले जात असेल तर ती चांगल्या गोष्टी घडवून आणण्यासाठी उपयुक्त का ठरू नये ? सुरुवातीला, प्रार्थना करून घेणे आणि खाद्य-पेयांची आहुती देऊन देवतेला प्रसन्न करून एवढीच कल्पना होती. हा सौदेबाजीचाच प्रकार होता असे म्हणायला हरकत नाही. "मी तुला हे देतो, तू मला अमुक अमुक दे." गीतेतही "देवान् भावयितान्" असे वचन आहे, त्याचा ह्या संदर्भात विचार करण्यासारखा आहे. तुमच्या ह्या कार्याची पूर्ती किती प्रमाणात होते ते पुरोहिताकडून करण्यात येणाऱ्या कर्मकांडावर अवलंबून असणार, म्हणून ह्या कार्यालाच 'बृहस्पति' अथवा 'ब्रह्मणस्पति' असे व्यक्तिरूप देण्यात आले. अशा रीतीने पुरोहित-वर्गाने स्वतःसाठी इतरांपेक्षा श्रेष्ठ असे विशेष-अधिकार-संपन्न असे स्थान निर्माण करून घेतले. होता होता, पुढे ते ह्या पृथ्वीतलावरील देवच (भू-देव) बनून बसले. शतपथ ब्राह्मणात म्हटले आहे,—"अहंव देवाः अथ ये ब्राह्मणाः"

यज्ञासाठी आवश्यक वस्तू दोन, अग्नी आणि पाणी. तेज आणि वर्षा, ही अग्नी आणि सोम ह्यांची प्रतीके. ह्यांची उत्पत्ती तिघांपैकी दोन लोकांत होते. ते दोन लोक म्हणजे आकाश आणि अंतरिक्ष. देव (म्हणजे निसर्गाच्या शक्ती) यांचे उत्पादन सदैव करीत असतात. मेघांमध्ये विजेच्या रूपाने, समुद्रात आणि प्रकाशाच्या सोनेरी सागरात सूर्याप्रमाणे अग्नी नेहमी जलात आढळतो. गायी नेहमी आढळतात आणि दोहण्यासाठी परत आणल्या जात असतात. त्यांची स्तने दुधाने ओथंबलेली असतात. (मेघरूपी गायी आणि त्यात ओथंबून भरलेले वर्षेचे पाणी). त्याचप्रमाणे प्रकाशरूपी गायी आणि त्यांच्या ओटीत भरलेले सोनेरी दूध, म्हणजे उषा आणि तिची किरणे. देवांचे हे नियत कर्तव्य आहे आणि ते ते आपले कर्तव्य ऋताच्या (नियम) मार्गाने सदासर्वकाळ करीत असतात. त्यांना चिर-तरुण, चिरंजीव आणि उल्हसित ठेवण्या-

साठी आवश्यकता असते ती फक्त पोषणाची. अमृत प्राशन करून ते हे पोषण प्राप्त करून घेत असतात. हे अमृत — स्वर्गीय सोमरस—त्यांना कसे मिळते ? कुठे तरी अत्युच्च अशा स्वर्गात, सर्व विश्वाचे आश्रयस्थान असलेल्या गुप्त अशा लोकात जे जलतत्त्व असते ते गाळून देव ह्या सोमरसाची उत्पत्ती करून घेतात. हे सारे कार्य, जगत्–संसाराचे हे यंत्र चालू ठेवण्याचा हा खटाटोप कशासाठी ? त्यात एक उद्देश आहे. तो कोणता ? ह्या पृथ्वीतलावर वास करणाऱ्या मानव–वंशावर उपकार करणे, हा तो उद्देश. हा मानववंश म्हणजे, पुण्य–मार्गाने जाणाऱ्या सद्विचार करणाऱ्या माणसांचा, म्हणजे आर्यांचा वंश. असे आहे म्हणून माणसाला देवांशी सलोख्याचे संबंध ठेवणे, त्यांना प्रसन्न करणे आवश्यकच आहे. ते उपकार करतात म्हणूनच केवळ नव्हे, तर, ते जर रुष्ट झाले तर ते रुसून बसतील, प्रहार करतील; आणि तसे झाले तर मग कुठे राहील ही पृथ्वी आणि कुठे असतील तीवर नांदणारे हे मानवी प्राणी ! कोणाचे उपकार मानायचे तर ते दोन प्रकारांनी मानता येतात. एक तर शब्दांनी आणि दुसरे त्यांना भेटी, उपहार वगैरे देऊन ! म्हणून देवांना ह्या दोन्ही गोष्टी भरपूर प्रमाणात दिल्या पाहिजेत. बहुतेक लोकांना मनात वाटते पण त्यांना बोलून दाखविता येत नाही. त्यांना द्यावेसे पुष्कळ वाटते, पण काय द्यावे आणि कसे द्यावे ते त्यांना नेहमी कळतेच असे नाही. आणि तसे झाले तर मग न दिल्याचा फार गंभीर परिणाम घडवून आणणारा अपराध हातून घडावयाचा ! म्हणून माणसांनी ही कामगिरी आपल्या कवि–पुरोहितांकडे सोपविलेली बरी. हे पुरोहित म्हणजे लोकांच्या वतीने बोलणारे, दान देणारे; इतरांपेक्षा श्रेष्ठ, गूढ ज्ञान जाणणारी माणसे ती. माणसासारखी माणसे असली तरी माणसाच्याही वरची, ज्यांच्या ठायी स्वर्गीय वाक्प्रविष्ट झाली आहे अशी ती माणसे !

भूलोक आणि स्वर्गलोक या दोहोंमध्ये मध्यस्थ म्हणून काम करणारे पुरोहित होते. आकाशात अविरतपणे चालत असलेले अनंत व्यापार (अंतरिक्षीय नाटच) म्हणजे एक विशाल यज्ञभूमी, असे म्हटले आहे. हा आकाशस्थ यज्ञ मूळ नमुना; भूतलावर चाललेला यज्ञ म्हणजे त्या मुळाची नक्कल. हे आकाशात यज्ञ करणारे कोण ? ते होते पूर्वज, मोक्षाला गेलेले पितर, पुरोहित वर्गाचे तसेच मानवंशाचे—विशेषेकरून आर्यांचे जनक. वर आकाशात देवांच्या बरोबरच यज्ञाचा शोध लावणारे असे ते होते.

यज्ञाच्या किचकट अशा कर्मकांडात अधिक खोल शिरण्याचे आपल्याला प्रयोजन नाही. या भव्य क्रिया-कलापाच्या म्हणजे यज्ञाच्या मुळाशी उद्देश काय होता ते आपण लक्षात घेतले की पुरे. दीक्षाविधीच्या प्रारंभालाच ते स्पष्ट करण्यात आले आहे. तेथे " सत्यं दीक्षा " असे म्हटले आहे. सत्याने व्रत घेतल्याचा आरंभ होतो. 'दिक्ष' असते 'योग्य', म्हणून जो दीक्षित झाला त्याने फक्त सत्यच बोलले पाहिजे. मग प्रश्न विचारला जातो,–केवळ सत्यच बोलू शकेल असा मनुष्य कोण आहे ? देवच फक्त सत्यपूर्ण आहेत. पण मनुष्य असत्याने भरलेला आहे. त्याने प्रत्येकाला दुसऱ्याला "विचक्षण" या शब्दाने संबोधायला सांगितले पाहिजे. विचक्षण म्हणजे अंतर्भेदी दृष्टीने पाहणारा. माणसाच्या ठायी चक्षूची 'सत्य' म्हणून स्थापना झालेली आहे. म्हणून, काही स्वतःचे म्हणून सांगायला आलेल्या माणसाला लोक विचारतात, " तू हे पाहिले आहेस काय ? " आणि, "होय. मी हे पाहिले आहे " असे उत्तर जर मिळाले तर ते त्यावर विश्वास ठेवतात.

पुरोहितांनी दीक्षा-पद्धतीची योजना केलेली आहे तीत 'दीक्षित' ह्याला गर्भ-बीज मानले आहे. दीक्षेचा आशय असा:–" कोणतीही वस्तू जशी असेल तसे मनात चिंतन करणे याला 'ऋतं' अशी संज्ञा असून कोणतीही वस्तु जशी असेल तसे तिचे मुखाने कथन करणे याला 'सत्य' असे म्हणतात. दीक्षा ही ऋत–सत्यात्मक आहे. देव हे सत्य स्वरूप आहेत पण मनुष्य हे प्रायः असत्यालाच धरून वर्तन करतात. ऋतसत्याच्या बाबतीत वैफल्य उत्पन्न झाल्यास दीक्षा विफल होते. यास्तव दीक्षा-ग्रहण केलेल्या यजमानाने सत्य असेल तेच बोलावे. (ऐतरेय ब्राह्मण, पंजिका १, पृ. २६ बापटशास्त्री) यज्ञाच्या साधनाने पुरोहित दीक्षिताला अगदी नव्याने जन्माला घालतो असा अर्थ आहे. तो त्याच्या मस्तकावर पाण्याने सिंचन करतो, कारण जल हे बीज आहे. अशा रीतीने नव्या जन्मासाठी त्याला बीज दिल्यानंतर तो त्याला दीक्षा देतो. दीक्षितासाठी निश्चित असलेल्या जागेत तो त्याला मग घेऊन जातो, कारण हे स्थान म्हणजे दीक्षिताचे 'गर्भाशय'. त्याला अंगावर वस्त्र टाकून झाकून टाकण्यात येते. हे वस्त्र म्हणजे दीक्षिताचे 'कौल';

ह्याच्यासकट तो मुलाप्रमाणे जन्माला येणार; बाहेर मृगाजिन असते. कल्पनेतली 'नाळ' आच्छादून टाकणारे हे मृगाजिन. गर्भाशयातील बीजाप्रमाणे तो आपल्या मुठी वळवून घेतो. त्याच्या ह्या मिटलेल्या मुठीत सर्व देवता आणि यज्ञ असतात. मग मृगाजिन काढून टाकण्यात येते आणि तो स्नानासाठी खाली येतो. अशा पद्धतीने कौलासह मूल जन्माला येते.

नवा जन्म मिळाल्याचे हे प्रतीक आहे हे ह्यावरून लक्षात येईल. एवढे झाल्यानंतर दुसऱ्या एका विधीला सुरुवात होते. ह्या विधीला 'प्रयनीय इष्टि' असे नाव आहे. 'प्रय' म्हणजे पुढे जाणे. ह्या विधीच्या द्वारा यज्ञ करणारे स्वर्गाकडे जातात. प्रयनीय विधीत श्वास आत घेतला जातो (प्राण) आणि 'उदायानीय' ह्या संपूर्ण यज्ञाच्या समाप्तीच्या विधीत श्वास बाहेर टाकला जातो. हे प्राणायामाचे पूर्वरूप म्हणावे.

ह्या विधीचे मी एवढे खुलासेवार वर्णन करण्याचे कारण असे की, ते लक्षात घेतल्यावाचून आरण्यक, औपनिषदिक आणि शेवटी बुद्धाचा विचार कसकसा प्रगत होत गेला ते लक्षात येणार नाही. 'स्वर्गकामी यजेत' म्हणजे स्वर्गप्राप्तीची इच्छा असणाऱ्याने यज्ञ केलाच पाहिजे, अशी ही शिकवण होती. मृत्यूनंतर यज्ञकर्ता अग्नीतून पुन्हा जन्माला येतो. यज्ञाला विष्णूशी आणि प्रजापतीशी एकरूप मानले गेले, ह्यातच त्याची महनीयता होती.

पशुबली सोमयागाचा एक अंतर्भूत भाग होता. त्यात "सौत्रमणि" अंतर्भूत असे. ह्यात एक पशु आणि सुरा अर्पण करण्यात येत असत.

पुढे, सर्व प्रकारच्या इच्छा तृप्त होण्यासाठी आणि रोगांचा उपचार म्हणून यज्ञाचा उपयोग केला जाऊ लागला.

पशूची श्वासोच्छ्वसन क्रिया त्याचे नाक-तोंड दाबून बंद करण्यात येई, व त्याला बुकलून ठार मारण्यात येत असे. ह्या पद्धतीला 'संज्ञपनम्' म्हणजे रक्त न सांडता प्राणहरण करणे, असे म्हटले जात असे.

ख्रिस्ती धर्मग्रंथांच्या आदेशाविरुद्ध अपराध करणाऱ्याला "रक्त न सांडू देता होईल तेवढ्या दयाळूपणाने दंड देण्यात यावा." असा विधी त्या धर्मातही सांगितला आहे, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. "जगतें अनेक आहेत" अशी शिकवण देणाऱ्या जिऑर्डिनो ब्रूनो ह्या गृहस्थाला अशाच पद्धतीने शिक्षा करण्यात आली होती. विज्ञानाच्या पायी इ. स. १६०० च्या फेब्रु. १६ तारखेला बळी पडलेल्या ह्या थोर हुतात्म्याने न्यायाधीशाला उद्देशून जे उद्गार त्याप्रसंगी काढले ते असे होते. "मला दिलेल्या शिक्षेचा स्वीकार करताना मला शेवटी भीती वाटते त्यापेक्षा किती तरी अधिक भीती तुम्हाला ती शिक्षा देताना होत असावी." ब्रूनोला खांबाशी बांधून जिवंत जाळण्यात आले.

विहारावर म्हणजे यज्ञभूमीवर तीन अग्निकुंडे असत, त्यांना 'गार्हपत्य' (कौटुंबिक स्वरूपाच्या विधीसाठी), 'दाक्षिणात्य' (पितरांना आहुती मिळावी यासाठी), आणि 'आहवनीय' (स्वर्गात स्थान मिळावे म्हणून देवांसाठी), अशी नावे होती. या तीन प्रकारच्या अग्नीप्रमाणे 'ऋणत्रया'ची म्हणजे तीन प्रकारच्या ऋणांची कल्पना होती. एक, पितृऋण. पुत्राला जन्म देऊन (पुत्रेण पितृणाम्) हे ऋण फेडले जात असे. दुसरे ऋषि–ऋण ब्रह्मचर्य पालन करून त्याची फेड करायची. आणि तिसरे देवऋण, यज्ञ करून हे ऋण फेडायचे असे.

या जगात आणि परलोकात सुख प्राप्त व्हावे (इह-अमुत्र फलभोग) यासाठी यज्ञ–संस्था निर्माण करण्यात आली, हे आपण विसरता कामा नये. म्हणूनच पुत्र-प्राप्तीवर भर देण्यात आला. कारण त्यामुळे पुत्ररूपाने मनुष्याला या जगात अमरत्व (प्रजामृतत्व) लाभते.

यज्ञ केल्याने यज्ञ करणाऱ्याला स्वर्ग प्राप्त होतो असे मानले गेले होते. त्यात स्वतःचा बळी देण्याच्या जबाबदारीतून त्याने स्वतःला मुक्त करून घेतले होते. स्वतःऐवजी कोणत्या तरी एका पशूचा बळी दिला म्हणजे झाले. स्वतःच्या जागी दुसऱ्या कोणाकडून प्रायश्चित्त घेवविण्याची ख्रिस्ती–धर्मातील कल्पना आहे ती या संदर्भात लक्षात घेण्याजोगी आहे.

शेतीवर आधारलेली अर्थव्यवस्था वाढीस लागल्यानंतर यज्ञसंस्थेसंबंधी ज्या कल्पना होत्या त्यांचा भ्रमनिरास व्हायला लागला. पण त्याचा एक फायदा झाला होता हे निश्चित. त्यामुळे अरण्ये नाहीशी करून मनुष्यवस्तीसाठी आणि शेतासाठी जमिनी मोकळ्या करण्यात आल्या, आणि त्यामुळे अनेक कलांना व उद्योगधंद्यांना चालनाही मिळाली. त्या संस्थेने जी एक महत्त्वाची गोष्ट प्रामुख्याने साधली ती म्हणजे चातुर्व-

अनुक्रमणिका

ण्यांवर उभारलेली समाज-व्यवस्था. ऋग्वेदातील पुरुष-सूक्तात वर्णन केल्याप्रमाणे ही चातुर्वर्ण्यव्यवस्था म्हणजे परमात्म्याने केलेली निर्मिती होय, असे पुरोहितवर्गाने उद्घोषित केल ते येणेप्रमाणे:—

"अनंत मस्तके, अनंत डोळे, आणि अनंतपाद ह्यांनी युक्त असणारा हा परमेश्वर सर्व जगाला व्यापून जगाच्या पलीकडे व्यापून उरला आहे. 'त्या परमेश्वरापासून हे विस्तृत जग उत्पन्न झाले आणि त्या ब्रह्मांडामध्ये जीव उत्पन्न झाला. . .नंतर देवांनी जीवरूपी हविर्द्रव्यांनी यज्ञ केला. . .त्या यज्ञापासून जो विराट पुरुष उत्पन्न झाला, तो कोणत्या प्रकाराने केला? त्याचे तोंड कोणते? हात कोणते? मांड्या कोणत्या व पाय कोणते?... ब्राह्मण हे त्याचे मुख, क्षत्रिय हे त्याचे बाहू, वैश्य हे त्याच्या मांड्या आणि शूद्र हे पायापासून उत्पन्न झाले. (ऋग्वेद १०. ९०. १, ५, ६, ११, १२ चित्रावशास्त्री)

एका अर्थाने हा श्रमविभाजनाचाच प्रकार होता पण कालांतराने त्याने जातिव्यवस्थेचे रूप धारण केले. ह्यात ब्राह्मण मूर्धास्थानी विराजमान झाले. त्यामुळे क्षत्रियांचा विरोध उत्पन्न झाला. आरण्यकामध्ये विकसित झालेल्या विचारधारेबद्दल ह्या क्षत्रियांना बौद्धिक आकर्षण असावे असे दिसते. विवेचक बुद्धी जागी झाली आणि मग यज्ञसंस्थेचा जो प्रतीकात्मक असा कर्म-कांडाचा भाग होता त्यावरून हळूहळू विश्वास ढासळावयाला लागला. ज्याला शरीरसौष्ठव आणि पवित्र ज्ञान हवे असेल त्याने पूर्वेकडे वळावे, अन्नासाठी दक्षिणेकडे वळावे, पश्वादिकांसाठी पश्चिमेकडे वळावे, यावर मग श्रद्धा उरली नाही.

मृत्यूनंतर यज्ञकर्त्याला स्वर्गात पुनर्जन्म मिळतो हे जरी खरे मानले जात होते तरी एक प्रश्न शिल्लक उरतच होता. मृत्यूनंतर मागे उरते ते काय? उप-निषदात आणि ऐतरेय ब्राह्मणात 'आत्मा' ह्या शब्दाचा प्रयोग 'देह' या अर्थानेही झालेला आहे हे आपण विसरू नये.

ऋग्वेदातील मरणाच्या वेळची प्रार्थना या प्रश्नासंबंधी काही कल्पना देऊ शकते. ती प्रार्थना अशी आहे.—

हे मृत मनुष्या, तुझा डोळा सूर्याप्रत जावो. प्राण वायूप्रत जावो. आणि तूही आपल्या धर्मासह पृथ्वीवर अथवा स्वर्गावर जा, अंतरिक्षात जा...जन्मरहित असा जो भाग आहे त्यास तू आपल्या तेजाने नष्ट कर. हे अग्निदेवा, जो (मृत) स्वधा म्हणून तुला अर्पण केला त्याला तू पुन: पितरांकरता उत्पन्न कर. हा पुन: जीव धारण करून शरीर प्राप्त करो. हे सर्वश अग्ने, त्याला शरीर प्राप्त होवो. (ऋ. १० १६.३, ४, ५ चित्रावशास्त्री)

सर्वप्रमुख देव जो इंद्र त्याला आहुती दिल्यामुळ काही प्रभाव किंवा परिणाम घडून येतो की काय ह्याबद्दल शंका आणि निराशेचा सूर उत्पन्न झालेला दिसतो. एक मनुष्य उठला आणि त्याने असे निश्चय-पूर्वक विधान करण्याचे धाष्टर्य दाखविले की, "इंद्राला अस्तित्व नाही!" तो पुढे वेंधळकपणे विचारतो, "कोणी पाहिले आहे त्याला? आम्ही कोणाची स्तुती गावी?" (ऋ. ८. ८९, १००० चित्रावशास्त्री)

हीच गोष्ट "कस्मै देवाय हविषा विधेम" या सूत्रात आली आहे. आम्ही यज्ञातील आहुती अर्पण करायची ती कोणत्या देवाला? होता होता, शेवटी तो देव म्हणजे हिरण्यगर्भ अशी कल्पना होऊन तो आणि प्रजापती म्हणजे ब्रह्मा—निर्माणकर्ता एकच असे मानले गेले. (ऋग्वेद ५. १०. १२१ चित्रावशास्त्री)

आणि स्वर्ग म्हणजे काय? यज्ञ—संस्थेशी संबंध असलेल्या पूर्व मीमांसा विभागाच्या विचारकांनी प्रश्न उपस्थित केला,—स्वर्ग म्हणजे काही वास्तविक रूप असलेले द्रव्य आहे की आनंदरूप असा तो एक गुण आहे? अधिकारी भाष्यकार शबर स्वामी यांचे याबद्दल स्पष्ट मत असे आहे की, 'स्वर्ग' हा शब्द आनंदरूप अवस्थेसाठीच वापरलेला आहे. ते कोणा एखाद्या स्थानविशेषाचे नाव नाही.

'स्वर्ग' ही कोणती तरी एक घडवून आणता येण्याजोगी गोष्ट आहे. हा स्वर्ग निर्माण करण्यासाठी यज्ञकर्म हेच साधन असले पाहिजे. (देवतोऽद्देशेन कृतो द्रव्यत्याग:)

स्वर्गाचा अर्थ केवळ दु:खाचा अभाव एवढाच नाही तर निर्भेळ सुखाची प्राप्ती असा आहे.

आरण्यक आणि औपनिषदिक विचार मनन करणाऱ्या वर्गात वाढीला लागला, आणि मग यज्ञ-कांडाला अशी काही अवकळा आली की, पुरोहितांना मध्यस्थांचा एक निराळा वर्गच निर्माण करावा लागला. या वर्गाला 'प्रसर्पक' असे नाव देण्यात आले. यज्ञे

करावीत असा प्रचार करण्यासाठी हा वर्ग निर्माण केला गेला.

(पाहा,–महाराष्ट्र ज्ञानकोश, पृ. २१३, वेदविद्या).

ह्या युगाच्या शेवटी सर्वसाधारण परिस्थिती कशी होती ती थोडक्यात दृष्टीपुढे आणायची तर असे म्हणता येईल की, ह्या जगताची निर्मिती कोणी केली, ती कशी केली आणि ती कशाने केली यासंबंधीचा विचार, विश्वकर्मा हा उत्पत्तिकर्ता आहे असे मानल्या-नंतरही प्रगल्भ झालेला नव्हता.

चातुर्वर्ण्यावर आधारलेली समाज–व्यवस्था अपरिवर्तनीय अशा जातिसंस्थेत परिवर्तित होऊ लागली होती. मृत्यूनंतर कोण अथवा काय जिवंत राहते याचे निश्चित असे कोणतेही उत्तर मिळालेले नव्हते. पण एका विचाराची मात्र वाढ व्हायला लागली होती हे निश्चित. तो विचार असा; परमेश्वर म्हणजे कोणी मानवरूपधारी सृष्टीला जन्माला घालणारा असा नाही; ते काही तरी इंद्रियातीत तथ्य आहे. अतींद्रिय ज्ञानाच्या अनुरोधाने ते तथ्य सर्वव्यापी आहे; सत्य आणि ऋत (ऋत=शाश्वत नियम) असे नैतिक मूल्य, त्यावर विशेष भर दिलेला आठवतो. ईश्वरविषयक कल्पना नैतिक परिभाषेत 'सत्य–धर्म', 'सत्य–सूनु', 'सत्य सव' आणि 'ऋतवान्' अशा शब्दांनी व्यक्त केली जाऊ लागली. ह्या सर्व विचारधारांची परिणती औपनिषदिक धर्मात झाली ह्याचे निरूपण केनोपनिष-दात आणि छांदोग्योपनिषदात आले आहे. नैतिक सुव्यवस्थेवर उभारलेल्या धर्म–मताचे आगमन सूचित करणारी ही परिस्थिती होती. युद्धाने आपल्या धर्माचे प्रणयन केले ते ह्या नीतिव्यवस्थेच्या कल्पनेला अनुसरूनच.

ह्या आदिकालीन वैदिक मार्गाने वैशिष्टच सांगा-यचे तर, आल्बर्ट श्वाईत्झरच्या शब्दात "जगताचे आणि जीवनाचे अस्तित्व स्वीकारण्याचा मार्ग" असे करता येईल. शंकराचार्यांनी ज्याला "आत्मकेंद्रित" असे म्हटले आहे तो प्रवृत्तिमार्ग आणि श्वाईत्झरची व्याख्या ह्यात फरक नाही. "स्वर्गकामो यजेत्" किंवा "इह अमुत्र फल भोग" अशा सूत्रवाक्यांमधे हा विचार समर्पक झालेला आढळतो. ह्या विचाराचा अर्थ, शारीरिक सुखाच्या अनुरोधाने जीवनाचा अर्थ लावणे असा आहे.

बर्ट्रांड रसेल

---नी. र. वऱ्हाडपांडे

बर्ट्रांड रसेलचा जन्म १८७२ साली झाला. त्याचे घराणे इंग्लंडच्या इतिहासात प्रसिद्ध असे सरदारघराणे होते. त्याचे वडील फार स्वतंत्र विचाराचे होते, इतके की, आपल्या पत्नीला त्यांनी संभोग स्वातंत्र्य दिले होते. बर्ट्रांडच्या लहानपणीच त्याचे आईवाप वारल्यामुळे त्याला त्याच्या आजाआजीने वाढविले. आपल्या मुलाला ख्रिश्चन म्हणून वाढविण्यात येऊ नये असे बर्ट्रांडच्या वडिलांनी आपल्या मृत्युपत्रात लिहिले होते. पण, या त्यांच्या इच्छेकडे दुर्लक्ष करून बर्ट्रांडला ख्रिश्चन म्हणूनच वाढविण्यात आले.

बर्ट्रांडचे प्रारंभीचे शिक्षण घरीच झाले. लहानपणापासून त्याला गणितात इतकी गोडी होती की, पराईमध्ये कधीकधी आत्महत्त्या करण्याची इच्छा होई तेव्हा गणिताच्या आनंदाला आपण पारखे होऊ या कारणासाठी त्या बेतापासून परावृत्त होत असे. कोणतीही गोष्ट प्रमाणाशिवाय मानायची नाही हा त्याचा लहानपणापासून बाणा होता. युक्लिडची गृहीतेदेखील तो गृहीत धरायला तयार नव्हता. त्यावेळी त्याचा भाऊ त्याला गणित शिकवीत असे. ही गृहीते धरून चालल्याशिवाय पुढे जाणे अशक्य होईल असे त्याने बजावले. तेव्हा गणिताच्या अभ्यासात प्रगती करण्याच्या एकमात्र इच्छेने बर्ट्रांड ती गृहीते मानण्यास तयार झाला.

अभ्यासात बर्ट्रांडने थोडयाच अवधीत वरीच प्रगती केली व विद्यापीठात दाखल होण्यासाठी प्रवेशपरीक्षा दिली. या परीक्षेत त्याने इतकी बुद्धीची चमक दाखविली की, व्हाइटहेड हा त्याचा परीक्षक वेहद्द खूष झाला. पुढे केंम्ब्रिज विद्यापीठात रसेलने व्हाइटहेडच्याच हाताखाली गणिताचा अभ्यास केला व अल्पावधीतच तो रँग्लर झाला. यानंतर त्याने "भूमितीची मूलतत्त्वे" या विषयावर विद्यापीठाच्या अधिसदस्यतेसाठी (फेलोशिप) प्रबंध लिहिला. या प्रबंधाचाही एक परीक्षक व्हाइटहेडच होता. दुसरा परीक्षक वार्ड हा होता. वार्डला तो प्रबंध अत्यंत आवडला. पण, व्हाइटहेडने मात्र त्या प्रबंधाची वरीच हजेरी घेतली. पण हजेरी घेऊनही त्याने प्रबंध पारित केला व रसेलला अधिसदस्यता मिळाली.

गणिताची मूलतत्त्वे

यानंतर केवळ भूमितीच्या मूलतत्त्वावरच समाधान न मानता साऱ्याच गणिताची मूलतत्त्वे काय आहेत याचा शोध घेण्यासाठी रसेलने व्हाइटहेडच्या सहकार्याने आपला प्रमुख ग्रंथ जो "गणिताची मूलतत्त्वे" त्याची आखणी केली. हा ग्रंथ तीन मोठमोठ्या खंडात विभागलेला असून त्यात सारे गणित हा तर्कशास्त्राच्या बीजातून उद्भवलेला वटवृक्ष कसा आहे हे स्पष्ट केले आहे. गणिताच्या मुळाशी असलेल्या या बीजभूत तर्कशास्त्रीय कल्पना (१) वर्ग, (२) वर्गघटक या आहेत. साऱ्या गणिताचे मन्थन करणाऱ्या या ग्रंथराजामुळे गणिती तत्वज्ञ म्हणून रसेलची कीर्ती सर्वतोमुखी झाली. या ग्रंथाच्या लेखनाने रसेलला तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान यांची इतकी गोडी लागली की, त्यास गणिताचे क्षेत्र सोडून तो पूर्णपणे तत्त्वज्ञानाकडे वळला. तत्त्वज्ञानावरचे त्याचे प्रारंभीचे पुस्तक "तत्त्वज्ञानविषयक प्रश्न" हे आहे. काहींच्या मते रसेलच्या तत्त्वज्ञानावरील पुस्तकात हे सर्वोत्कृष्ट आहे. या पुस्तकातील महत्वाचे सिद्धान्त असे. (१) सुसंगती ही सत्याची व्याख्या मानणे चूक आहे. सत्याप्रमाणे एखादी कल्पित कथा देखील सुसंगत असू शकते. (२) ज्ञान जेव्हा कोणत्यातरी बाह्य वस्तूशी संवादी असते तेव्हाच ते सत्य म्हणविले जाते. (३) ज्ञान फक्त प्रत्यक्षासारख्या

एखाद्या अनुभवाने प्राप्त होऊ शकते, केवळ तर्काने नाही. तर्काने एका ज्ञानाची दुसऱ्या ज्ञानाशी संगती लावता येईल, पण नवीन ज्ञान निर्माण होणार नाही.

रसेलला एका अमेरिकन विद्यापीठाने व्याख्यानासाठी पाचारण केले तेव्हा त्याने व्याख्यानासाठी "आपले बाह्य जगाचे ज्ञान" हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात झोनोच्या प्रसिद्ध कूटाची चर्चा आहे. ही कूटे अशी. (१) एखादा बाण अ पासून ब पर्यंत जाऊ शकणार नाही कारण ते पूर्ण अंतर जायच्या आधी त्याला त्याच्या अर्धे अंतर जावे लागेल व अर्धे अंतर जायच्या आधी चतुर्थांश अंतर जावे लागेल, चतुर्थांश जाण्याच्या आधी अष्टमांश जावे लागेल. अंतराची ही मालिका संपूच शकणार नाही. कारण द्वितीयांश, चतुर्थांश ही अपूर्णांकांची श्रेणी अनंत आहे. तिच्यात शेवटचा अपूर्णांकच नाही. (२) ससा कासवाला कधीच धरू शकणार नाही. कारण कासव जेथे आहे तेथे पोचायला सशाला थोडा वेळ लागेलच व कासव कितीही हळू चालत असले तरी तेवढ्या वेळात ते थोडे तरी अंतर पुढे जाईलच. एकूण या शर्यतीच्या कोणत्याही क्षणी ससा व कासव हे वेगवेगळ्या ठिकाणीच असतील. (३) जो बाण उडतोसा वाटतो तो उडण्याच्या क्षणी आपल्या आकारमानाइतकीच जागा व्यापतो. आपल्या आकारमानाइतकी जागा व्यापणे म्हणजेच स्थिर राहणे. तीन फूट लांबीचा बाण तीन फुटाच्या जागेतच उडू शकणार नाही. अर्थात् असा कोणताच क्षण नाही की जेव्हा बाण तीन फुटापेक्षा जास्त जागा व्यापतो. म्हणून तो सदा स्थिरच असतो असे मानले पाहिजे. झोनोचा चवथा युक्तिवाद बराच किचकट असल्यामुळे येथे देत नाही. रसेलने झोनोचे हे युक्तिवाद गणिताच्या दृष्टीने तपासून दाखविले आहेत. आधुनिक गणिताने या अडचणी पूर्णपणे सोडविल्या आहेत असे त्याचे म्हणणे आहे जगाचे मिथ्यात्व सिद्ध करण्यासाठी तत्वज्ञ जे युक्तिवाद वापरतात ते झोनोच्या युक्तिवादाच्या मानाने किती तरी पोकळ आहेत, जगाचे मिथ्यात्व सिद्ध करण्यासाठी तर्कशास्त्राचा आधार मिळणे शक्य नाही असाही रसेलचा सिद्धान्त आहे.

"तत्त्वज्ञानाची रूपरेषा" या ग्रंथात रसेल पुष्कळसा वर्कलेच्या आहारी गेलेला दिसतो. दृश्य जग मेंदूत घडणाऱ्या घटनांवर अवलंबून आहे असे तो या ग्रंथात म्हणतो. म्हणून या ग्रंथातील तत्त्वज्ञानाला "टोपीखालील तत्त्वज्ञान" असे जोडने नाव दिलेले आहे.

"मनोमीमांसा" व "जडमीमांसा" हे दोन ग्रंथ एकमेकांना पूरक आहेत. जिवंत शरीराचे वर्तन, जड पदार्थांच्या वर्तनापेक्षा अधिक गुंतागुंतीचे व अनपेक्षित असते या परता त्या दोघात काही फरक नाही, आपण स्वतः जिवंत असल्यामुळे आपल्या वर्तनाचे आपल्याला आन्तरिक ज्ञान होते. तसे जड पदार्थांच्या वर्तनाचे होत नाही. पण स्वतःच्या वर्तनाचा विचार न करता दुसऱ्या जिवंत व्यक्तीच्या वर्तनाचा विचार केला तर त्याच्याही वर्तनाचे आन्तरिक ज्ञान आपल्याला होत नाही. तेव्हा आन्तरिक ज्ञानाच्या आधारावर जीवच्छरीर व जड वस्तु यांच्यातील भेद पाडणे युक्त नाही.

मन हे याप्रमाणे जड वस्तूहून वाटते तेवढे भिन्न नाही. त्याचप्रमाणे जडवस्तू मनापेक्षा वाटते तितकी भिन्न नाही हे आधुनिक भौतिकीने सिद्ध केले आहे. अणूंच्या जगातले सूक्ष्म व्यवहार अपरिवर्तनीय व निरपवाद अशा नियमांनी बांधलेले नसतात. अर्थात् जडसृष्टीचे व्यवहार देखील जीवच्छरीराच्या व्यवहाराप्रमाणे सापवाद असू शकतात.

मग जगाचे व आदितत्व जड आहे की चेतन आहे? याला रसेलचे उत्तर असे की ते जडही नाही आणि चेतनही नाही. ते तटस्थ आहे. एका विवक्षित नियमानुसार घटना झाली की त्याला जड म्हणतात व दुसऱ्या एखाद्या नियमानुसार घटना झाली की त्याला चेतन म्हणतात. रसेलचा प्रसिद्ध तटस्थ एकतावाद तो हाच होय.

धर्म आणि विज्ञान

"धर्म आणि विज्ञान" हे रसेलच्या सर्वोत्कृष्ट पुस्तकांपैकी एक आहे. प्रत्ययकारक तात्त्विक विचार व रसाळ शैली यामुळे हे पुस्तक संपेपर्यंत खाली ठेववत नाही. यातील धर्म व विज्ञान यांच्या संघर्षाचा इतिहास इतका विनोदपूर्ण आहे की आपण एखादे प्रहसन वाचत आहोत असे वाटते. या संघर्षात धर्माला विज्ञानासमोर प्रत्येक वेळा हार खावी लागली. पण प्रत्येक वेळी पूर्वीचा विज्ञानविरोध हा 'खऱ्या' धर्मावर आधारलेला नव्हता, खऱ्या धर्माचा विज्ञानाशी काही विरोध नाही असे म्हणून धर्माने वेळ मारून नेली. अर्थात् खरा धर्म,

ज्याची मुळे खोल रुजली आहेत अशा सुप्रतिष्ठित विज्ञानाशीच फक्त जुळते घेतो, नवीन विज्ञानाला नेहमी त्याचा विरोध असतो.

धर्म व विज्ञान यांचा संघर्ष वर्णून रसेलने ईश्वर, आत्मा वगैरे तत्त्वांची चर्चा केली आहे. व ईश्वराचे अस्तित्व व आत्म्याचे अमरत्व मानण्यास काहीच प्रमाण नाही असा सिद्धांत मांडला आहे.

धर्म व विज्ञान या ग्रंथाला पूरक असा रसेलचा दुसरा ग्रंथ 'मी ख्रिस्ती का नाही?' हा होय. या ग्रंथात त्याने ख्रिस्त खरोखरच होऊन गेला की नाही याबद्दल शंका आहे व तो खरोखरच होऊन गेला असे मानले तरी तो नैतिक दृष्ट्या सर्वश्रेष्ठ होता असे मानता येत नाही, बुद्ध व साक्रेटीस हे अनेक बाबतीत ख्रिस्तापेक्षा श्रेष्ठ होते असे दाखवून दिले आहे. आपल्याशी सहमत नसणाऱ्याबद्दलचा बुद्ध व साक्रेटीस यांचा दृष्टिकोन ख्रिस्तापेक्षा पुष्कळच उदार होता. माझी शिकवणूक न मानणाऱ्यांना नरकात कशा घोर यातना भोगाव्या लागतील याचे ख्रिस्ताने मिटक्या मारीत वर्णन केले आहे. यावरून तो अजातशत्रू व प्रेममूर्ती असा आदर्श पुरुष नव्हता असे म्हणावे लागते.

रसेलचा पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास हा एक संस्मरणीय ग्रंथ आहे. रसाळ विवेचन व सुबोध शैली यामुळे हा ग्रंथ गहन नाही असे काही लोकांना वाटते. या लोकांच्या मते जे सहज समजू शकते ते गहन असू शकत नाही.

या ग्रंथावरील दुसरा आक्षेप असा की, त्यावर रसेलच्या वैयक्तिक ग्रहांचा जबरदस्त पगडा बसलेला आहे. या आरोपाला उत्तर देताना रसेल म्हणतो की, वैयक्तिक ग्रहांचा प्रभाव लेखनावर पडल्याने काही बिघडत नाही. उलट त्यामुळे लेखनात जिवंतपणा येतो. हे वैयक्तिक ग्रह केवळ अज्ञानजन्य असतील व त्यांचा प्रस्तुत विषयाशी अर्थाअर्थी काही संबंध नसेल तरच त्यांचा लेखनावर होणारा परिणाम अनिष्ट म्हणता येईल. पण एरवी हा प्रभाव इष्टच असतो. ज्या वाचकाला हा प्रभाव आवडत नसेल त्याने माझे पुस्तक वाचल्यावर माझ्याविरुद्ध ग्रहांचा प्रभाव असणारी पुस्तके वाचावी, म्हणजे त्यांची दिशाभूल होणार नाही.

हे समर्थन सबळ आहे व रसेलचा तत्त्वज्ञानाचा इतिहास या विषयावरील दुसऱ्या कोणत्याही पुस्तकापेक्षा अधिक मनोरंजक व उद्बोधक आहे यात शंका नाही.

लौकिक लेखन

रसेलने विद्वानांसाठी केलेले लेखन महत्त्वाचे आहेत पण त्याने अविद्वानांसाठी जे लेखन केलेले आहे ते देखील महत्त्वाचे आहे. स्वतःच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न उपस्थित झाला तेव्हा त्याने एक शाळा काढली. या शाळेत बाह्य बंधने शक्य तितकी शिथिल करण्याचा प्रयत्न होता. पण, आवश्यक तेथे बंधने घालण्यासही अनमान केला जात नसे. रसेल म्हणतो की, लहान मुले निरागस असतात हा समज काव्यमय असला तरी खरा नाही. शाळेतील एका मुलीने एकदा सुपात सुई घातली. याची चौकशी करता आपल्या भावाच्या पोटात ती जाऊन तो मरावा असा तिचा बेत होता असे उघडकीस आले अनिष्ट प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी प्रौढांनाही नियंत्रणाची जरुरी असते. मग मुलांचे नियंत्रणाशिवाय भागेल अशी आशा करणे अवास्तव आहे.

रसेलच्या 'शिक्षणासंबंधी' व 'शिक्षण आणि समाजव्यवस्था' या दोन पुस्तकांमध्ये व्यक्तित्वाचा विकास होईल. इतक्याच प्रमाणात बंधने असावीत, ठरीव साच्याची यंत्रे निर्माण न करता व्यक्तित्वशाली माणसे निर्माण करणे हा शिक्षणाचा उद्देश असावा, उत्कृष्ट संघटनांपेक्षा उत्कृष्ट व्यक्ती अधिक मोलाच्या असतात, वगैरे सिद्धांत मांडलेले आहेत.

रसेलची विवाहविषयक मते त्याच्या "विवाह व नीती" या पुस्तकात मांडलेली आहेत. या पुस्तकातील मतांमुळेच एका अमेरिकन न्यायालयाने रसेल हा शिक्षक होण्यास अपात्र आहे असा निर्णय दिला होता. या ग्रंथातील प्रतिपादनाचे सार असे : (१) स्त्रीपुरुषातील प्रेम हा सृष्टीतील एक उदात्त अनुभव आहे. (२) विवाहामध्ये जोडीदारांनी एकमेकांपासून लैंगिक एकनिष्ठेची अपेक्षा करून, फक्त विवाहबाह्य प्रजोत्पादन वर्ज्य मानावे. (३) घटस्फोट अधिक सुलभ असावा, प्रेमाचा लोप हे घटस्फोटास पुरेसे कारण मानण्यात यावे.

विवाह व नीति, हे पुस्तक वाचनीय वाटते ते काही लोक समजतात त्याप्रमाणे केवळ ते स्वैराचाराला

उत्तेजन देते म्हणून नव्हे. त्याची लेखनशैली अत्यंत मोहक आहे हे त्याचे कारण आहे. "प्रेमाचे जीवनातील स्थान" हे त्यातील प्रकरण म्हणजे काव्य व तर्कसंगत विचार यांचा उत्कृष्ट संगम आहे.

असे असले तरी या पुस्तकाचे शास्त्रीय दृष्ट्या मूल्य फार कमी आहे असे म्हणावे लागते. त्यात शास्त्रीय विवेचनापेक्षा रसेलच्या आवडीनिवडींचा प्रपंच अधिक आहे. जोडीदाराने लैंगिक स्वातंत्र्य भोगले तरी विवाह टिकणे कठीण नाही, मात्र विवाहबाह्य संतीती झाली तर विवाह टिकणे शक्य वा इष्ट नाही हे रसेलचे मत केवळ त्याच्या वैयक्तिक प्रवृत्तीवर प्रकाश टाकते. जगात अनेक नवरे करण्याच्या चालीपासून तो अनेक स्त्रिया करून त्यांचे नावही परपुरषाच्या दृष्टीस पडू नये म्हणून त्यांना पड्यात ठेवण्याच्या चालीपर्यंत अनेक चाली व विवाहप्रकार नांदले आहेत. त्या प्रत्येकात काहींची सोय व काहींची गैरसोय झाली आहे. सर्वांचीच सोय होईल अशी कोणतीही पद्धत कुणाला शोधून काढता आलेली नाही. रसेलने या सर्व पद्धतींची शास्त्रीय चर्चा करून त्यातील गुणदोष दाखवावे ही वाचकांची अपेक्षा त्याच्या पुस्तकाने फलद्रूप होत नाही. विवाहबाह्य संबंध अपत्योत्पादक नसतील तर ते चालू द्यावे असे म्हणताना हे केवळ आपल्या इच्छेवर अवलंबून असल्याइतकी संततीनियमनाची साधने अचूक असतात असे त्याने गृहीत धरले आहे, तेही निराधार आहे.

प्रणयजीवन

रसेलचे प्रणयजीवन हे त्याच्या विवाहविषयक विचारांबद्दल अनुकूल ग्रह निर्माण करीत, असे नाही. रसेलच्या वासना अत्यंत प्रबल होत्या. पराईमध्ये वासनेचा उपशम करण्यासाठी आपल्याला स्वमैथुन करावे लागे हे त्याने प्रांजलपणे कबूल केले आहे. तो विवाहास उत्सुक होता. पण तुझी मुले वेडी निपजण्याचा संभव आहे म्हणून तू विवाह करू नयेस असे त्याला अनेकांनी सांगितले. या पेचातून सुटण्यासाठी लग्न तर करायचे पण संतती मात्र होऊ द्यायची नाही असा त्याने निर्णय घेतला. हा निर्णय तत्कालीन व्हिक्टोरियन समाजाला धक्का देणारा होता. तरी त्याने त्याची पर्वा न करता लग्न केले.

काही काळ वैवाहिक आनंदात घालविल्यावर एके दिवशी एकटेच फिरताना आपले आपल्या बायकोवर प्रेम उरले नाही असा त्याला साक्षात्कार झाला. लगेच घरी जाऊन त्याने बायकोला तसे चक्कच सांगितले व दुसऱ्या बायकोच्या तो शोधास लागला. अशा रीतीने रसेलने अनेक बायका केल्या व सोडल्या. वापरलेला जोडा कंटाळा आला म्हणून टाकून द्यावा याप्रमाणे रसेल बायका टाकीत असे. एकाच बायकोपासून त्याला मुले झाली. पण या बायकोला देखील त्याने टाकले. निदान मुले झाल्यावर तरी विवाहबंधन अभंग असावे, आई एकाची बायको व बाप दुसरीचाच नवरा ही परिस्थिती कोणत्याही मुलांना आवडणार नाही. काव्यात्मक प्रेमाच्या आधारावर नाही तरी निदान दिलजमाईच्या आधारावर कायमचे विवाहबंधन स्थापित करण्यात रसेलला यश आले नाही हे त्याच्या आयुष्यातील फार मोठे वैगुण्य समजले पाहिजे. त्यामुळे त्याच्या अंतःकरणात एक प्रकारची शून्यता निर्माण झाली असली पाहिजे.

समाजवाद व कम्युनिझम

१९ व्या शतकातील इतर अनेक इंग्रजी लेखकांप्रमाणे रसेललाही रशियन राज्यक्रांती व तेथील नवसमाज यांच्याबद्दल कुतूहल निर्माण झाले. तो लेनिनच्या कारकीर्दीत रशियात जावून आला. त्याची फारच निराशा झाली. त्याच्या मते लेनिनची बुद्धी दुय्यम दर्जाची होती. रशियात सारी अव्यवस्था होती. सत्ताधारी साऱ्या देशात कोंडवाड्याचे स्वरूप होते. विचार, उच्चार व आचार–सारेच परतंत्र होते. गरीबी थैमान घालीत होती. घाण व माशा यांचा सुकाळ होता. सारे जेवण कापडाने झाकून, कापडाखाली अलगत हात घालून एकेक घास उचलावा लागे. तसे न केले तर क्षणार्धात माशांचे ढीग अन्नावर तुटून पडत व त्यांना हाकलणे अशक्य होऊन बसे. जुनी घडी विसकटलेली होती व नवीन घडी बसायची होती अशा संक्रमणावस्थेमुळे रशियातील निराशाजनक परिस्थिती निर्माण झालेली होती असे रसेलला वाटले नाही. ही परिस्थिती कम्युनिस्ट व्यवस्थेत अपरिहार्य आहे असे त्याचे मत झाले.

'बोलशेविझम्, तत्त्व व कृति' या पुस्तकात रसेलने कम्युनिझम्संबंधी आपले विचार मांडले आहेत.

हे पुस्तक भविष्यदर्शी ठरले. कम्युनिझम् पश्चिमेकडे न पसरता पूर्वेकडे पसरेल, ह्याचा प्रसार इस्लामच्या प्रसारासारखाच धडाक्याने होईल, पण इस्लामच्या अनुयायांना ज्या सामर्थ्याशी टक्कर द्यावी लागली नाही अशा एका मोठ्या सामर्थ्याशी कम्युनिझमला तोंड द्यावे लागेल, हे मोठे सामर्थ्य अमेरिकेचे होय, अशी भाकिते रसेलने या पुस्तकात करून ठेवली आहेत.

रसेलचा कम्युनिझमला विरोध असला तरी एकोणीसाव्या शतकातल्या इतर अनेक इंग्रजी लेखकां-प्रमाणे त्याचा समाजवादाकडे कल होता. समाजवादाची कैफियत आपल्या लेखात त्याने सरकारीकरणाचे समर्थन केले आहे. त्यातील मुख्य युक्तिवाद असा आहे की अर्थिक क्षेत्रात स्पर्धा सुरू ठेवल्याने काही धंदे या स्पर्धेत मरतात. हे धंदे मेल्यामुळे जे नुकसान होते ते समजा-लाच कोणत्या तरी रूपाने सोसावे लागते, कारण कोणाचाही पैसा बुडाला तरी समाजातले तेवढे धन नाहीसे होऊन एकंदर समाजाचेच नुकसान होते.

आधुनिक समाजवाद्यांनी या युक्तिवादातील चूक ओळखली आहे. स्पर्धेने अकार्यक्षम उद्योग मरतात व तेवढे समाजाचे नुकसान होते हे खरे असले तरी स्पर्धे-शिवाय अकार्यक्षम उद्योग जगू दिल्याने समाजाच्या उत्पादनक्षमतेत काहीच प्रगती न होऊन समाजाचे जे नुकसान होते त्या मानाने ते नुकसान थोडे असते. म्हणून स्पर्धा नाहीशी करणारे सरकारीकरण नेहमीच हितकारक असते असे नव्हे. याच कारणास्तव ब्रिटिश समाजवादी पक्षाने सरकारी करणाविरुद्ध कौल दिला आहे.

अणुशस्त्र विरोधकाचे अणुशस्त्रदास्य

युद्धाच्या बाबतीत रसेलच्या मतात बरेच परि-वर्तन होत गेले. पहिल्या महायुद्धात तो शांततावादी होता. ब्रिटिश नागरिकांनी युद्धाला कोणत्याही प्रकारे मदत करू नये असा त्याने प्रचार केला. म्हणून त्याला तुरुंगवास देखील भोगावा लागला. दुसऱ्या युद्धात तो इतर इंग्रजांप्रमाणेच कट्टर नात्सीविरोधी होता. हिटलरला त्याच्या आईने जन्मताच मारून टाकले असते तर जगावरची आपत्ती टळली असती असे त्याने म्हटले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर रशियाच्या विरुद्ध अणुशस्त्रानिशी निवारक युद्ध करावे असा त्याने प्रचार केला. पुढे रशियाने अणुगोल तयार केला व ठोशास ठोसा देण्याचे सामर्थ्य कमावले. तेव्हा रसेलला एकदम अणुयुद्ध मानवता विरोधी वाटू लागले. त्याला आता कम्युनिस्ट राजवटीत पूर्वी कधीही न दिसणारे गुण दिसू लागले. त्याने अणुयुद्धाविरुद्ध चळवळी केल्या व आपण फार मोठे मानवतावादी आहोत अशी स्वतःची समजूत करून घेतली.

पण थोडा विचार केल्यावरोबर रसेलच्या या मानवतावादाचे वेगडी स्वरूप स्पष्ट होते. रसेल हा कट्टर इंग्रज होता. मानवतावाद ही त्याची भूमिका होती, स्वभाव नव्हता. इंग्लंडचा पराभव होऊ लागला की त्याला मनस्वी वाईट वाटे. हिटलरच्या आईने त्याला जन्मल्यावरोबर मारून टाकायला पाहिजे होते असे म्हणताना इतरांना चर्चिल व इतर ब्रिटिश साम्रा-ज्यवादी यांच्याबद्दल असेच वाटण्याचा संभव आहे हा विचारही त्याच्या मनाला शिवला नाही. इंग्रज-अमे-रिकनांनी हिरोशिमा व नागासाकीवर अणुगोल टाकण्याचा संतानी निर्णय घेतला याबद्दल रसेलने निषेधाचे अवाक्षरही काढले नाही. हे कृत्य नात्सीच्या अत्याचारापेक्षा शतपटीने अधिक निर्घृण होते. जपान चार आठ दिवसातच शरण येणार होता हे उघड होते. अर्थात् लष्करीदृष्टया हिरोशिमा व नागासाकी यांची राखरांगोळी करण्याची काहीही आवश्यकता नव्हती. आसुरी अघोरतेचे हे कृत्य होते. रसेलला या कृत्याचे-वेळी मानवतावाद आठवला नाही. चीन व पाकीस्तान यांच्याशी झालेल्या संघर्षाचे वेळी रसेलची सहानुभूती आक्रमकाकडे होती. कारण बिचाऱ्या भारताजवळ अणुगोलाचे सामर्थ्य नव्हते. भारताने अणुस्फोट केला असता तर रसेलच्या सहानुभूतीचा ओघ लगेच भारता-कडे वळला असता. रशियाच्या अणुगोलाने रसेलला मानवतावादी बनविले, रशियन नेत्यांच्या संतपणाने नव्हे.

अतरौलीचा सरदार

--वामन इंगळे

पुसद संगीत संमेलनाची बातमी वृत्तपत्रातून वाचली आणि मनात संगीत उलथापालथी होणं सुरू झालं. एक चांगलं गाणं काटोलपासून काही अंतरावर घडणार आणि आपण तिथं नसणार म्हणजे काय ? जगातील सर्व चांगल्या घडामोडी आपल्या गैरहजेरीतच घडत असतील हेही खरंच. इच्छा जर घोडे बनल्या असत्या तर सर्व सुंदराचं साक्षित्व भोगता आलं असतं. आणि इच्छेनं वाढविलेल्या इच्छाबंधांचं एक सुंदर जग निर्माण झालं असतं. फाटके खिसे; जगरहाटीची बंधनं या मोठ्या निर्दय घटना असतात एवढं मात्र खरं. पण, तरी काही हरकत नाही. आपल्याला 'वहोत दूर' असलेल्या दिल्लीला जायचं नसून फक्त पुसदला जायचं आहे या कल्पनेनं फाटका खिसाही गलित हिंमत व्हायचा थांबला. फाटक्या खिशाचंही एवढं काही नाही. कारण त्याची तर मेजॉरिटीच आहे. त्या मेजॉरिटीच्या भरंवशावर 'भरले खिसे' निवडून येतात हेही एक वेळ जाऊ द्या. त्यापेक्षाही आता अडचण दुसरीच होती. म्हणजे असं की, स्वतःचेच दहा रुपये खर्च करून फक्त गाणं ऐकायला चाललो हे उघडपणे सांगायचीही चोरी. स्वतःचे दहा खर्चून जायची ठिकाणं वेगळी असतात. शेगाव (शिर्डी) (गाणगापूर) राजापूर ही त्यांपैकी काही. पण, स्वतःचे चार चव्वल खर्चून शिवाय पूर्ण दोन दिवसांचा प्रवास करणं हा केवढा मूर्खपणा. आपल्या गावचे ते अमुकतमुक बुवाच तर किती छान गातात, हो की नाही ? आता गावचे बुवा सुरेख गात असतीलही. पण म्हणून काही त्यांचे गुलाम-अली आणि कुमार गंधर्व व्हायचे आहेत काय ? अशा वेळी बुवा सुचतो. पण, बुवांची माध्यान्हीची सोय लागत नाही तेव्हा मात्र आपल्याला गावच्या बुवांची आठवण होत नाही.

आपल्या मनाचंही काही विलक्षणच. हा गाववाला तो परगाववाला; हा पश्चिम महाराष्ट्रवाला, हा विदर्भवाला; हा दक्षिणवाला तो शिवसेनेवाला अशा व्याघातांच्या अढी तयार केल्याशिवाय त्या मनांचा हंगाम पिकतच नाही. पण ही ठसठस एखाद्या फोडाची आहे किंवा काय हे मात्र वारकाऱ्यानं शोधलं पाहिजे. आणि म्हणून मी मन घट्ट करून आणि मामे-बहिणीसाठी वर पहायला जायचं आहे अशी सबब पुढे करून पुसदच्या मोटारीत बसलो.

रेस्टहाऊसवर पोचल्यानंतर सरदार झोपले आहेत असं कळलं. एकवेळ सिंहाला गाढ झोपेतून उठवा पण गायकाला आणि पैलवानाला झोपेतून उठवू नका असं कुणीतरी म्हटलं आहे. त्या न्यायानं मी तिथं घुटमळलो. पण तोपर्यंत त्यांच्या तबल्याच्या साथीला आलेल्या भास्करराव तिवसकरांची भेट घ्यावी म्हणून मी शोध केला. ते आणि प्रभुदेवांचे दोन शिष्य रस्त्यातच भेटले. सरदारांच्या खोलीत प्रवेश करताच सरदारांच्या एका शिष्यवरानं चक्क कानठळ्या बसेल अशी हाक मारून त्यांना झोपेतून उठवलं. म्हणजे उस्तादांना भ्यायचे; त्यांची गुडगुडी चेतवायचे; सतत नम्र चेहरा करून वावरायचे दिवस निघून गेले तर ! माझ्या मनात प्रश्न आला इथं सरदार शिष्यांबरोबर चक्क बरोबरीच्या नात्यानं वागत होते. खरं म्हणजे जुने दिवस मोठे चिक्कट असतात. ते जाऊ नये म्हणून महाजन मंडळीही स्वतः प्रयत्नशील असतात. कुमारांसारखा एखादा--आणि त्याच्या सुबुद्ध प्रभावात आलेले सरदारांसारखे काही-जण मात्र सतत नवेपणाला सामोरे जात असतात. सरदारांकडे पाहिल्यावर एक कल्पना माझ्या मनात आली. हा माणूस एखाद्या गर्भश्रीमंत गुजराती तरुणा-सारखा बोलका, हसतमुख आणि लाघवी दिसतो खरा. परंतु याच्या बोलण्या-चालण्यात जुन्या गवयांचं एकही लक्षण दिसत नाही. स्वतःविषयी आणि तेवढंच बोलणं नाही; किंवा दुसऱ्याची निंदाही नाही. म्हणजे काळ

बराच पुढे निघून गेला आहे आणि आपणच जुन्या काळात रेंगाळतो आहोसं वाटलं. मी विचारात पडलेला पाहून सरदार विचारतात;

'काय वामनराव, यापूर्वी कधी मला ऐकलं की नाही ?'

'दोनदा ऐकलं. . .पण पोट भरलं नाही.'

'मग ऐकता ? '

'जरूर.'

'रात्री सर्वांसाठी गाईन. आता तुमच्यासाठी गातो.' चहाचा कप खाली ठेऊन सरदार शिष्यांना सूचना करतात. शिष्यमंडळी तानपुरे सावरतात. मँजले तिरखवाँ तिवसकर तवला जुळवून घेतात. प्रभुदेव एक क्षण डोळे वंद करून काय म्हणायचं तेवढं आठवतात. दुसऱ्याच क्षणी आवाज लावून ते 'गावतीचं' चिरप्रसन्न तोंड घेतात, 'घनघन. . . . .' त्रितालाचा सम कायम करून तिवसकर गोड ठेका धरून ठेवतात. नोमतोमचा रेंगाळणारा कालखाऊपणा नाही की, उगाच न पेलणाऱ्या लयीचा दिखाऊपणा नाही. सरदार सरळ सरळ राग स्वरूपाच्या गाभ्यालाच जाऊन झोंवतात. ही चैतन्यपूर्णता बैरागी भैरवात अधिक सघन आणि अर्थपूर्ण वनते. शास्त्रकारांची काही वेगळी भूमिका असेल; पण वैरागी भैरवात जे अध्यात्म उमटतं त्याचा रंगढंग मला स्वतःला खूपसा मानवीच वाटतो. विशेषतः चिंतनशील माणसाच्या आयुष्यात एक गहिरा विरागच असतो. तो चिंतनशील माणूस आस्तिक नास्तिक कसाही असो. क्षणभर त्याच्या मनात मानवी संस्कृतीचा विचार येतो. आपलं सुख ते दुसऱ्याचं दुःख होऊ नये अशी खबरदारी तो घेतो--दुसऱ्यांनाही घ्यावयास लावतो. भगवे कपडे केले तेवढ्यानंच काही विराग साधत नाही. तुकारामाच्या संसारी आयुष्यातही विराग होता आणि महर्षी कार्ल मार्क्स आणि आईन्स्टीनच्या आयुष्यातही अशा विरागाशिवाय दुसरं काय होतं ? आणि दुसरं जे वरंच काही असेल ते या अशा मानवसन्मुख विरागाशिवाय अर्थपूर्ण झालं असतं का ? वैरागी भैरव ऐकला की, हा असा खोल विराग माझ्या मनात भरत राहतो. सरदारांच्या बैरागीत परपीडेच्या जाणीवेची गंभीर अदब साक्षात् होऊ लागते. कुमारांचा 'गांधी' राग मी अजून ऐकला नाही. त्यावरील विनोदी टीका मात्र तरीही बेसुरी वाटली. स्वर हे एक व्याकरणच तेवढं नाही. त्याचा लगाव आणि सांधात मानवी सुखदुःखाशी समर्थपणे एकत्व साधू शकेल. फक्त धुनउगम रागच का ? मी तर म्हणतो की, प्रत्येकच राग हा मातीचंच गाणं गातो आहे. हे समग्र गाणं मातीचं नसेल तर मग गाण्यातून एक पोकळीच तेवढी व्यक्त होत आहे असं म्हणावं लागणार आहे. प्रत्येकाचा वेगळा अनुभव जमेस धरूनही पोकळीचं समर्थन साधेल असं वाटत नाही. सरदारांच्या चैतन्यपूर्ण गायकीतून मातीचं हे गाणं अधिकाधिक ओळखीचं आणि तरी नवं वाटू लागतं.

सरदार हे काही कुमारांचे वा गुलामअलींचे गंडावंद शागीर्द नाहीत. वसवराज, सवाईगंधर्व आणि जगन्नाथवुवा पुरोहित ही त्यांची गुरुस्थानं. त्यांतूनही जगन्नाथवुवांची शिस्तशीर तालीम अधिक सातत्यानं घेतलेली. जगन्नाथवुवा म्हणजे 'अतरौली'चा अक्षय वट. त्यांचं गाणं मी त्यांच्या थकल्या वयात ऐकलेलं. तेव्हाही वोलतानांनी वुवा एक सुंदर महिरप काढायचे. ढंगदार बंदीशी ही त्यांची खास देण. आणि तरीही सरदारांच्या गायकीची मुद्रा एकटचा अतरौलीची नाही. चैतन्यपूर्णतेवर प्रभाव कुमारांचा आहे. चक्राकार फिरणाऱ्या भुरक्या तानांवर गुलामअली--वर्कतअलींची मुद्रा आहे. वोलताना अतरौलीच्या आहेत तर कधी कधी मल्लिकार्जुनांची सातत्यपूर्ण स्वरभरणीही ओळख देऊन जाते. मनाची दारं सुबुद्धपणे उघडी ठेवली म्हणजे हे असे मोकळे वारे शिरू शकतात. तो स्वच्छ वारा ऊर भरून आत घ्यायचा; त्याला स्वतःच्या व्यक्तित्वाचा खास स्पर्श घडवायचा आणि मग आविष्कारास सिद्ध व्हायचं. आकाशाची सावली पडूच देणार नाही ही प्रतिज्ञा कधी पूर्ण होण्यासारखी नाही. अद्वितीय समजल्या गेलेल्या कुमारांच्या गायकीतही ॐकारनाथ दिसतातच. (वामनराव देशपांड्यांना ग्वाल्हेरची मुद्राही दिसते.) आकाश वा परंपरा सरळ सरळ कधी नाकारता येत नाहीत. त्यांना नवे अर्थ देता येतात. सरदारांनी परंपरेच्या आकाशाखाली राहून स्वतःची गायकी घडविली आहे. जे स्वीकारायचं ते निवडून. त्यांतील चैतन्य जाता कामा नये. अनुकरणाची शीग मापट्यावर राहता कामा नये. वारा सर्वांचा पण श्वासापुरता आपण आपला निवडनिवडतोच की नाही ? खरं म्हणजे अशा वेळी 'निवडणं' हेही कृत्रिमच. सरदारांना असा स्वतःचा

सहज स्वर लाभला आहे. त्याचा पीळ, आवाका, पोत हे सारंच अभिजात आणि महनीय आहे. हा स्वर अधिकाधिक शक्तिमंत होत राहणार आहे अशी त्याला सर्ववेधी डोळस दिशा लाभली आहे. वयीतल्या वेली-प्रमाणे चक्री फिरत असणारा हा अतरौलीचा सरदार स्वर्गीय बर्कतअलीसाहेबांची उणीव भरून काढणार आहे. इतिहासाची पुनरावृत्ती होणं हे ठीकच परंतु नवेपणाची गरज इतिहासाला नेहमीच पडत आली आहे. माझं पोट भरलं होतं हे खरंच. पण भूकही चेतली होती. मामेबहिणीसाठी वरसंशोधन ही नुसती गंमत झाली. वराचे सुराशी यमकही साधते. पण मला एक सच्चा सूर सापडला होता. परतीच्या प्रवासात 'घनधन...' हे अदृश्य धन घेऊनच मी परतत होतो.

मराठी चरित्रात्मक बखर

—सौ. उमा देशमुख

मराठी गद्यवाङ्मयाचा बखरी हा एक अत्यंत अमोल असा ठेवा आहे. बखर या शब्दाचे निरनिराळे अर्थ होतात. पण सामान्यत: बखर म्हणजे 'ऐतिहासिक वीर पुरुष वा वीरघटना यांचा इतिहास.' बखरीत इतिहास, पुराण, चरित्र व काव्य यांचे सुंदर मिश्रण झालेले आढळते. जवळजवळ सर्वच बखरीत ऐतिहासिक सत्यावरोवर पुराणातील अद्भुतता, चरित्रातील व्यक्तिरेखा आणि काव्यातील रसवत्ता एकवटलेल्या दिसतात. ज्या बखरीत काही विशिष्ट ऐतिहासिक व्यक्तींच्या जीवनरेखा स्पष्ट झालेल्या असतात अशा बखरींना चरित्रात्मक बखरी म्हणावयास हरकत नाही. या बखरीतून इतिहास आणि चरित्र यांचा सुरेख संगम बघावयास मिळतो.

चरित्रात घटना व विचारप्रवाह यांना गौणस्थान असून चरित्रनायकाच्या संदर्भात घटना घडल्या पाहिजेत. म्हणजे चरित्रनायकाला केंद्रस्थानी कल्पून त्याच्या भोवती घटना घडून त्यातून चरित्रनायकाची व्यक्तिरेखा जिवंत व्हावयास पाहिजे. चरित्रकाराला चरित्रनायकाच्या जन्ममृत्यूच्या मर्यादेबाहेर जाता येत नाही. इतिहासाला ही मर्यादा राहात नाही. तसेच घटनांच्या न्यायपूर्ण (judicious) निवडीला चरित्रात फार महत्त्व आहे. चरित्र–नायकाचे गुणवर्णन करीत असता त्याच्या अंगी असलेल्या दोषांचेही स्वरूप स्पष्ट करणे चरित्रलेखकाला अत्यंत आवश्यक आहे. कारण त्यातून त्याच्या स्वभावाचे पैलू लक्षात येतात व त्या व्यक्तीने विशिष्ट काळी विशिष्ट वर्तन का केले याचा उलगडा होण्याची शक्यता असते. या दृष्टीने बॉस्वेलचे जॉनसन चरित्र, लिटनस्ट्रॅचीचे व्हिक्टोरिया-राणीचे चरित्र किंवा आपल्याकडील लक्ष्मीबाई टिळक यांची स्मृतिचित्रे ही लक्षात घेण्यासारखी आहेत. 'आदर्शचरित्र' या नात्याने बखरीचे पुर्नमूल्यन करण्या-पूर्वी मराठीतील चरित्रात्मक वाङ्मयाची पूर्वपीठिका बघितली पाहिजे.

महानुभाव ग्रंथकारांनी मराठीभाषेला गद्यात्मक रूप दिले. पद्यामध्ये तत्त्वज्ञान सांगायची प्रथा त्या काळात असतानाच महानुभाव विचारवंतांनी आपल्या पंथातील प्रमुख व्यक्तींची जीवनचित्रे गद्यातून रेखाटली. मराठी चरित्रवाङ्मयाचे मूळ आपल्याला या जीवन-चरित्रात सापडते. परंतु या लेखनामागची प्रेरणा शोधल्यास ती आपल्याला चरित्रनायकाविषयीच्या आदरात आणि पूज्यवुद्धीत सापडते. चरित्रनायका-विषयी पूज्यवुद्धी हीच त्यांच्या विषयीच्या आख्यायिका गोळा करण्यास कारणीभूत झालेली होती. त्यामुळे चरित्रनायकाचा जेणेकरून गुणगौरव होईल हाच प्रयत्न ग्रंथकार करताना दिसतात. पण आजचा चरित्रकार आपल्या चरित्रनायकाच्या मनुष्यत्वातून त्याचे विभूति-मत्व कसे निर्माण झालेले असते हे दाखवितो तर महानुभावपंथातील चरित्रकार आपल्या चरित्रनायकाचे विभूतिमत्व गृहीत धरून तो मानवी अवतार म्हणून कसा वागला याचे दिग्दर्शन करतो. त्यामुळे अशा चरित्रातून 'ईश्वरी अवतारा'च्या, 'दैवीचमत्कारा'ना प्राधान्य मिळणे अपरिहार्य होते आणि त्यामुळे ही चरित्रे अलौकिक स्वरूपाची झालीत. त्यात मानवी मनाची उकल झालेली दिसून येत नाही.

संतांनी लिहिलेली चरित्रे लक्ष्यात घेतल्यास, नामदेवकृत 'ज्ञानेश्वर चरित्र' किंवा महीपतीची 'संतचरित्रे' भक्ताच्या भूमिकेतून लिहिली गेलीत. त्यामुळे महानुभाव चरित्रवाङ्मयातून चरित्रनायका-कडे बघण्याची जी दृष्टी होती तीच किंब ना काहीशा प्रकर्षाने प्रगट झालेली दिसून येते. त्यामुळे त्यांना आध्यात्मिक चरित्रे असे म्हणता येईल. महीपतीने जरी

निरनिराळ्या संतांची चरित्रे रेखाटली तरी त्या चरित्रातील आन्तर्जीवन एकसुरीच झालेले आहे.

चरित्रात्मक बखरी

महानुभाव चरित्रे आणि संतचरित्रे याहून चरित्रात्मक बखरीचे वेगळेपण नेमके कशात आहे हे पाहिले पाहिजे. प्रामुख्याने बखरीचे लेखन शिवकाळात व पेशवेकाळात झालेले आहे. याच काळात चरित्रात्मक बखर वाङमयाला विशेष बहर का यावा ? याचे उत्तर शिवाजीच्या देदीप्यमान अशा कर्तृत्वात सापडते. शिवाजीसारख्या राष्ट्रपुरुषाचा समाजमनावर अतिशय खोल परिणाम झालेला होता. अशा या युगपुरुषाचे चरित्र लिहिणे तत्कालीन लेखकांना भूषणास्पद वाटणे स्वाभाविक होते. आणि या प्रेरणेतून चरित्रात्मक बखरींचा जन्म झाला. शिवाजी हा महाराष्ट्रातील वीरपुरुष असून वीरयुगाचा निर्माता होता. तेव्हा त्याला ईश्वरीअवतार कल्पून त्याच्यावर स्तुतिकुसुमे बखरकारांनीही उधळली. पण त्यांची भूमिका साधकाची व भक्ताची नव्हती. आपल्यापैकीच शिवाजी हा एक पराक्रमी माणूस आहे ही जाणीव बखरीतील चरित्रातून दिसून येते. ही जाणीव हे Human Element मराठी गद्याला नवीन होते.

बखर आणि चरित्रात्मक बखर

बखर आणि चरित्रात्मक बखर यात देखील एक आंतरिक फरक आहे. चरित्रात्मक बखरीत चरित्र नायकाचे संदर्भात घटना घडताना दिसतात. उदा० 'पाणिपतची बखर' व 'भाऊसाहेबांची बखर' या दोन बखरी एकाच विषयावर आणि प्रसंगावर असून देखील या दोन बखरीत आंतरिक फरक जाणवतो. 'पाणिपतच्या बखरी'त भाऊसाहेबांच्या गुणगौरवाला तेवढे स्थान आहे. पण तीतील युद्धप्रसंगाच्या गौरवपूर्ण वर्णनात त्यांच्या व्यक्तिरेखेला मात्र आकार येऊ शकला नाही. होळकर, शिंदे, तसेच भाऊसाहेब या सर्वांच्याच पराक्रमांचे व व्यक्तिमत्वाचे तेथे रेखाटन आहे. पण भाऊसाहेबांच्या बखरीतील नवव्या प्रकरणापासून भाऊसाहेबांच्या भोवती सर्व घटना फिरतात. जणू भाऊसाहेबांच्या व्यक्तिरेखेला उठाव मिळण्यासाठीच लेखकाने आधीची सात आठ प्रकरणे खर्ची घातली आहेत. साऱ्या घटना, सारे प्रसंग अशारीतीने घडतात की त्यामुळे भाऊसाहेब पेशवे यांचे व्यक्तिमत्व झळाळून आले.

कलात्मकतेच्या दृष्टीने चरित्रात्मक बखरीतील व्यक्तिचित्रे ही इतर बखरीतील व्यक्तिवर्णनापेक्षा अधिक रेखीव वाटतात. वाङ्मयनिर्मितीच्या बाबतीत या युगाचा अपरिहार्य परिणाम म्हणजे बखरींची निर्मिती होय. याच काळात संतचरित्रे निर्माण होत होतीच, नाही असे नाही. पण त्यात न आढळणारा वास्तवतेचा जिवंत झरा चरित्रात्मक बखरीतूनच वाहू लागला असे दिसून येते.

शिवपूर्वकालीन चरित्रात्मक बखर व शिवकालीन बखर यांचा विचार करता शिवकाळातील चरित्रात्मक बखर ही बहराला आलेली दिसते. शिवपूर्वकालातील 'शालिवाहनाची बखर' ही कालानुक्रमाने पहिली बखर ठरते. हिच्या दोन प्रती उपलब्ध असल्या तरी 'चरित्र' या नात्याने तिला फारसे महत्त्व देता येणार नाही. केवळ एका ऐतिहासिक शककर्त्या पुरुषाची नोंद एवढेच तिचे महत्त्व !

शिवकाळ हा संपूर्ण बखरवाङमयाचा प्राणभूत असा कालखंड आहे. त्यात शिवचरित्र व शिवकालीन घटना यावर अनेक बखरी निर्माण झाल्या. 'सभासदाची बखर', '९१ कलमी बखर' या बखरींत कमीजास्त भर घालून पुढील अनेक बखरी निर्माण झाल्या. विशेषत: 'सभासदाची बखर' म्हणजे शिवाजीच्या चरित्र या नात्याने जिवंत व्यक्तिरेखेचा आदर्श ठरावी इतकी सुंदर झाली आहे. सर्व घटना घडतात त्या शिवाजीच्या संदर्भातच. शिवाजीची, सुसंगत घटनांच्या साह्याने जिवंत व्यक्तिरेखा निर्माण करण्यात सभासद यशस्वी ठरला आहे. शिवाजीच्या निर्वाणाचे वर्णन सभासद अत्यंत हृदयस्पर्शी करतो आणि त्यातून शिवाजीची लौकिक, तेजस्वी, पराक्रमी अशी व्यक्तिरेखा पूर्ण आकारत जाते. उदा० " राजीयाचे देहावसान झाले. ते दिवशी पृथवीकंप जाहला. गगनी धूमकेतु उदेला...अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्री शंभु महादेवी तळयाचे उदक रक्तांबर झाले. पाण्यातील मच्छ बाहेर पडून अमासवाणी उदक जाहले........" सभासद बखरीत व ९१ कलमी बखरीत येणारा वर्णनांचा त्रोटकपणा 'सप्तप्रकरणात्मक बखर', 'शिवदिग्विजय', 'शिवाजीप्रताप' यात कमी कमी होत

गेलेला दिसतो. अद्‌भुत चमत्कारांची वर्णनेही कमी झालेली आढळतात. संस्कृत महाकाव्यातून निर्माण होणाऱ्या धीरोदात्त नायकाची, वातावरणाची आणि रसनिर्मितीची बरोबरी करू शकले असे नायक वातावरण आणि रसनिर्मिती चरित्रात्मक बखरीतून निर्माण झाली.

पेशवे काळातील बखरींना शिवकालीन बखरीची समृद्ध अशी पार्श्वभूमी मिळाली आहे. शिवकाळाने मराठ्यांच्या साम्राज्याचा उत्कर्ष बघितला तर पेशवे काळाला पानिपताच्या घनघोर रणसंग्रामात मराठ्यांना पत्करावी लागलेली हार बघावी लागली. पानिपत येथे मराठ्यांची विस्कटलेली घडी पुढे खर्ड्याच्या लढाईत सावरली गेली. पण या हारजितीचा परिणाम तत्कालीन चरित्रात्मक बखरीवर झालेला दिसून येतो.

पाणिपताचा रणसंग्राम हा भाऊसाहेबांच्या बखरीचा विषय आहे. वास्तविक ही चरित्रात्मक बखर नाही. परंतु या बखरीचा संपूर्ण उत्तरार्ध भाऊसाहेबांचो व्यक्तिरेखा चितारण्यात खर्ची पडला आहे. दहाव्या प्रकरणात भाऊसाहेब तांदुळजाच्या लढाईत विजय मिळवून परतलेले आहेत. 'ते समयी भाऊसाहेब यासी गर्व बहुत जाहला' असे ग्राष्टर्याचे विधान बखरकार करतो. 'तो गर्वाचे घर खाली, ईश्वरास असह्य अशा आनंदात असता अकस्मात शिंदे यांची पत्रे येऊन पोचली.' ही पत्रे वाचताच भाऊसाहेब दुःखी कसे झाले याचे चित्र बखरकाराने पौराणिक वीर पुरुषांचे दाखले देऊन वर्णन केले आहे. चरित्रकाराला आवश्यक असलेले वर्णनकौशल्य येथे दिसून येते. "आपले जागा मुहूर्त मात्र दंग होऊन बसले. जसा टाक्यांनी दगड फोडावा किंवा निर्जीव काष्ठाचा पुतळा तैसी देह अवथा होऊन तटस्थ बैसले धैर्य समुद्र ढवळला." भाऊसाहेबांचा दुराग्रह, त्यांचा निश्चय, नानासाहेबांची राजा दशरथासारखी झालेली अवस्था, पायगुंता म्हणून गोपिकाबाईंनी विश्वासरावांना पानिपतावर पाठविले तो प्रसंग. हे सारे प्रसंग भाऊसाहेबांच्या संदर्भात एक वेगळेच रूप घेतात–अधिक अर्थपूर्ण बनतात.

यादवकाळापासून चरित्रवाङ्मयाला सुरवात झाली. चरित्रात्मक बखर हा आकृतिबंध शिवकाळात बहरला आणि पेशवाई बरोबरच संपुष्टात आला. या चरित्रात्मक बखरीतून चरित्रवाङ्मयाची मूल्ये दिसून येतात. 'हरिवंश', 'भोसलेवंश' इतके व्यापक स्वरूप तिला प्राप्त होते. 'पेशव्यांची बखर', 'मराठ्यांची बखर' अशा घराण्यांच्या बखरी निर्माण झाल्या.

चरित्रात्मक बखर वाङ्मय हा मराठी गद्याचे एक महत्त्वाचे लेणे होय. ही चरित्रे वाचीत असता त्यातून तत्कालीन राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थितीचे प्रतिबिंब दिसून येते. हे प्रतिबिंब तत्कालीन इतर मराठी वाङ्मयप्रकारातून दिसून येतेच असे नाही. निवडलेल्या चरित्रनायकाचे प्रभावी व्यक्तिभाव व वर्णनकाराच्या ठिकाणी असलेली वाङ्मयनिर्मिती क्षमता यांच्या समसमा–संयोगामुळे समृद्ध झालेल्या मराठी चरित्रात्मक बखरी हा मराठी वाङ्मयाचा एक बहुमोल ठेवा आहे, एवढे निःसंशय !

‘ रणांगण ’—एक विचार

—प्रा. दिलीपसिंह बैस

संज्ञाप्रवाहाचे एक वैशिष्टच हे आहे की, त्यात व्यक्त झालेले थोडे पण अव्यक्ताचा भरणा मात्र अधिकच. प्रकट, अर्ध प्रकट आणि अप्रकट अशा तीन थरांतील संज्ञाप्रवाहाचा परस्पर संघर्ष आणि समवाय होतो हे मानसशास्त्रीय सत्य आहे. त्यामुळे पुष्कळ वेळा अशा संज्ञाप्रवाहाचा अर्थ करताना तो पाऱ्यासारखा निसटून जातो. विशिष्ट अशा गोष्टीविषयी निश्चित सांगता येईलच असे नाही. त्यात जे गावते ते अर्धसत्य असू शकते किंवा त्याच्या विकृतीच्या चिंध्या तरी हाती येतात. काही जरी म्हटले तरी ते निश्चितीच्या पायरीवर व पातळीवर येण्याचा संभव कमी.

संज्ञाप्रवाहाच्या या निसटत्या प्रवृत्तीमुळे तिचे योग्य मूल्यांकन होणे हे अशक्य आहे का ? त्या विस्कळीत भाव-भावनांच्या गुंतावळीतून सलग तत्त्व वाहेर निघू शकेल का ? आणि जो काही नवनीत काढल्या जाईल तो शुद्धच असू शकेल का ? हे प्रश्न मनात उभे राहतात.

या संज्ञाप्रवाहातील ससांना पकडण्यासाठी विशिष्ट तत्त्वांच्या दोराची आवश्यकता भासू लागताच मर्ढेकरांच्या समीक्षामूल्यांची आठवण झाली. आणि लेखनगर्भ आत्मनिष्ठेने आपल्या अस्तित्वाची हळूच जाणीव करून दिली.

काय व्यक्त करायचे या प्रश्नाची छाननी अनावश्यक ठरवू या. उलट जे व्यक्त आहे त्याच्या सूक्ष्मावलोकनानंतर त्या विचारात, भावनेत किंवा कृतीत सर्वत्र सुसंगतता आढळून येते की नाही याची नोंद करणे अवश्य ठरते. व्यक्तावरून अव्यक्ताचा शोध व बोध होणे संभव नसले तरी व्यक्तातच अंतर्गत विसंगती शोधणे अशक्य नसते. तिचे मोजमाप निश्चित करता येऊन त्यातील चूक लेखकाच्या पदरात घालता येते. कारण लेखनगर्भ आत्मनिष्ठा ही प्रत्यक्ष सिद्ध करण्याची गोष्ट आहे.

ह्याच दृष्टीने ‘ रणांगण ’ ह्या कादंबरीचे नव्हे तर त्यातील प्रभावी भावनेत आंतरिक सुसंगती आढळते की नाही हे बघायचे आहे.

ही प्रभावी भावना म्हणजे ‘प्रेम’ होय. या प्रेमाच्या विविधत्वाचा प्रश्नही येथे गौण आहे.

मुख्य पात्रांच्या सुखदुःखाचे, विशेषतः दुःखाचेच कारण असणारी ही भावना असल्याकारणाने त्यातील नायक बॉब उर्फ चक्रधर आणि नायिका हर्टा यांच्यातील केवळ परस्परांच्या परस्परांविषयी वाटण्याऱ्या भावनांच्या जातीची व प्रतीची पोत तपासण्याची मर्यादा आखून घेणे योग्य वाटते. त्यायोगे ह्या कादंबरीचा विषय ‘रणांगण’ की ‘प्रेमाच्या वैफल्याची कथा’ ह्याविषयी काही उत्तर प्राप्त होण्याचीही शक्यता आहे. त्याचा निर्णय घेण्याचे हे स्थळ नव्हे.

बॉब आणि हर्टा यांच्या आत्मप्रकटीकरणाद्वारे त्यांच्या भावविश्वाचा भव्य चित्रपट आपल्या डोळ्यापुढे उभा राहतो. त्यांचे स्वतःचे आचरण, त्यांचे विचार, त्यांच्या प्रेमाच्या कल्पना, आणि एकमेकांविषयी वाटणारे आकर्षण ह्यांच्या सूक्ष्मावलोकनानंतर त्यात बरीच अंतर्गत विसंगती जाणवते.

या सर्वांच्या परिपाकातून बॉब आणि हर्टा यांच्यामधील प्रेमाचे स्वरूप नजरेसमोर आले म्हणजे त्यांच्याविषयी वाटणाऱ्या सहानुभूतीला तडा जातो. त्यांचे आक्रंदन ‘ विना आसू विना माया ’ अशा प्रकारचे भासू लागते. एकतर त्यांच्या प्रेमाला उत्कट म्हणणे आवश्यक आहे किंवा त्यांचे मुळी प्रेमच नव्हते असे म्हणणे

आवश्यक ठरते. ह्या प्रेमभावनेच्या सशाला पकडताना खरोखरच शृंगापत्ती ओढवण्याचा संभव अधिक.

बॉबच्या प्रेमविश्वाचा परिचय प्रथम करून घेऊ. पण बॉबचे जगच उफराटे झाले आहे. क्रमाने शेवटी सांगावयाचे ते, तो आधीच सांगून टाकत आहे. आरंभ, अंत, दिशांचा क्रम सगळं उलटल्यासारखं बॉबला जरी वाटत असलं तरी त्याच्या प्रेमाचा आरंभ आपणास सुरुवातीपासूनच सांगता येणे शक्य आहे. निदान तसा प्रयत्न होऊ शकतो.

बॉबचे पहिले प्रेम उमेवर बसते. त्याचा चुराडा उडतो. "तुझ्यावर असलेले प्रेम खरे नव्हते आणि नाही. पण एकाकी जीवन असह्य होते. मी दुसऱ्या एका मुलाच्या प्रेमात सापडले आहे. गेल्या काही महिने मनाने फार क्लेश भोगले. तुला ते दिसले असते तर तू क्षमा केली असतीस. मी त्याच्याशी लग्न करीत आहे." असे पत्र टाकून उमा त्याला आणि त्याच्या प्रेमाला रामराम ठोकते. आणा, भाका, शपथा यांना ठोकर मारते.

बॉबला धक्का बसतो. तो प्रीतीच्या अनुभवाचा द्वेष करू लागतो. गोडभेटी, भुलविणारी बोलणी, वेड लावणाऱ्या नजरा या सगळ्यांचा त्याला तिटकारा येतो. तरुण मुलींच्या मोहकपणात नखरा दिसू लागतो. स्त्रियांचे कोमल आवाज, त्यांचा नाजुकपणा, मनोहर लचक, मुरड सगळे ढोंग वाटते. नाटक वाटते. शिकारीची तयारी वाटते.

शेवटी तो उठतो आणि लंडन गाठतो. तेथे महान अवस्था प्राप्त होते ती अशी "भोग भोगायचे पुष्कळ आणि पुन्हा मनाने अलिप्त राह्यचे." त्याच्या भावनांचे तळे युरोपच्या थंडीने थिजून जाते. त्याचे बर्फ होते. हे इतके होते तरी हर्टाला पाहताच, "पण माझे सांगतो त्या दृष्टीने मी चकित झालो. थोडासा आकर्षित झालो." म्हणजे हे बर्फ समुद्री हवामानामुळे वितळायला लागतं.

हर्टाच्या पहिल्या भेटीतच ह्या मनाने अलिप्त राहण्याची प्रौढी मिरविणारा बॉब तिच्या हातात हात अडकवितो आणि बोटे हातात दाबून धरतो. पुढे "पण काल हर्टाच्या मिठीत न्हाऊन निघालेले हे शरीर त्यावरचे किल्मिश झडून गेल्यासारखे वाटते आहे."

ह्या ठिकाणची कृती व मागील वृत्ती यांच्यात कुठेतरी ताण पडल्याचे जाणवत नाही का ?

हर्टाशी प्रेमाचा खेळच खेळायचा असेल तर खेळू या असा तो निश्चय करतो. कारण प्रेमाला तो खेळ समजतो. त्याचे व्रण त्याच्या अंगावर असतात. त्याचे त्याला काही वाटत नाही. अनेक स्त्रिया त्याच्या जीवनात आल्या होत्या. हर्टा त्यापैकी एक. हर्टाऐवजी माथी आली असती तर ? काही फरक पडला नसता. लग्नाला तो शिळा पोळा समजतो. तरी शेवटी हर्टाशी लग्न करायला तयार होतोच. पण दुर्दैव. त्यांच्यामध्ये 'रणांगणा'चा अभेद्य अंतरपाट आडवा येतो. हर्टा पुढे आत्महत्या करते. त्या बातमीच्या अपार दुःखाने व्याकूळ होत्साता बॉब लिहीत बसतो.

बॉबचे हे धावते जीवन आणि विचार. बॉब प्रेमाला खेळ समजतो. मग हर्टावर त्याचे खरे प्रेम असते की तो प्रेमाचा खेळ असतो ? लग्नाला शिळा पोळा म्हणून शिळ्या प्रेमाचा स्वीकार करून लग्नाच्या पोळचालाही बाशिंग बांधण्यास सिद्ध होतो ते का ? प्रेमामुळे. छे ! हर्टाविषयी वाटणाऱ्या दयेमुळे.

बॉब हर्टाकडे प्रथम खेळ खेळण्याच्या दृष्टीने पाहतो. त्याची शेवटी परिणती होते ती दयेत. कारण बॉबचे आपल्यावर प्रेम असून त्यामुळेच तो लग्न करण्यास तयार झाला हे हर्टा मानायला तयार नाही.

हर्टाच्या जीवनाची वळणे आणि आडवळणे तपासणे आवश्यक आहे त्याद्वारे तिच्याबरोबर बॉबच्या स्वभाव वैशिष्ट्यांचे दर्शन होऊ शकेल.

हर्टा ही सुंदर असते. कळायला लागल्यापासून तिचे अनेकांकडे लक्ष जाते. पुढे फ्रान्सवर प्रेम बसते. युद्धामुळे त्याची ताटातूट होते. शांघायला जाताना बॉबकडे आकर्षित होते. तो मुंबईला उतरून जातो. पुढे ती आत्महत्या करते. बॉबवर असणाऱ्या प्रेमामुळे आणि असह्य विरहामुळे ती आत्महत्या करते असा ग्रह होऊन जातो.

हर्टा आत्महत्या करते ती का ? याचे निश्चित उत्तर कादंबरीत नाही. सर्वत्र प्रश्नचिन्हच आहेत.

हर्टाचे पूर्व चरित्र, बॉबशी स्वतः पुढाकार घेवून घडवून आणलेले संबंध, तिचे प्रेमाचे तत्त्वज्ञान, तिची भान हरपून टाकणारी, आत्महत्येला प्रवृत्त करणारी विकृती, फ्रान्सच्या एकनिष्ठ प्रेमाचा गळा दावल्याची प्रखर जाणीव, अनैतिक आचरण करीत आहोत याची सदैव जागृत राहणारी टोचणी ह्या सर्वांचा सामग्र्याने

अनुक्रमणिका

विचार केला तर तिची आत्महत्या ही स्वतःविषयी वाटणाऱ्या अपराधी भावनेमुळेच झाली असे व्यक्त परिस्थितीवरून निःसंशय म्हणता येईल.

'चार दिवस आठवण येईल. काळाच्या सहाणेवर मोठाली दुःखे घासून झिजून जातात.' या बेफिकीरी वृत्तीमुळेच 'प्रेम असले आणि वियोग झाला तरी हर्टा मरणार नाही असे तत्त्वज्ञान बॉब मांडतो. प्रत्यंतर उफराटे येते. बॉबची ही वस्तुस्थिती मानायची का त्याचा अंदाज चुकला असे मानायचे ? हर्टाचे निवेदन तपासू म्हणजे बॉब विषयीची भावना लक्षात येईल.

हर्टा पत्र लिहिते. त्यावेळी शिष्यांच्या आठवणीने तिचे मन भरून येते. 'आपल्या सगळ्यांच्या प्रीतीला अपेक्षेचे किल्मिश होते. पण लुईवरील त्यांच्या लोभात कसला स्वार्थ होता ? ' हर्टाचा स्वार्थ किंवा अपेक्षा तरी कोणती होती ?

बॉबला ती आपण होऊन भेटते. प्रणयी जोडप्याला पाहून, 'त्यांच्या वस्तुपाठाचा घडा गिरविण्याचा' सल्ला बॉबला देते की, ज्याने निर्भिडपणाने बॉब चकित होतो. त्याअगोदर 'रात्र किती सुंदर आहे आणि तुम्हाला पैंजेचे आणि पैशाचे विचार सुचतात. तुमच्याकडून प्रेम होणे कठीण दिसतं.' किंवा 'बॉब, भारी थंडी वाजते आहे. मला जवळ घेतोस ? ' हे उद्‌गार. बॉबला तिने स्नानाचा केलेला आग्रह. 'श्लाफेनजेल मिदनांदर' गीताचा प्रत्यक्ष अर्थ समजावून सांगण्यास त्याच्या केबिनमध्ये प्रवेश. तेथे पोटरीतून बाहेर पडताच मक्याच्या रसरशीत कणसाप्रमाणे उभे राहणे. आणि पुढे तिने मान खाली टाकली. वळून मागे टेकली. हात सोडून दिले आणि विव्हळ स्वरात एवढाच उद्‌गार काढला 'O God' हे हर्टाचे बॉबविषयी प्रेमाचे खरे स्वरूप. याची जात सांगण्याची आवश्यकता भासू नये.

शेवटच्या पत्रातील पुन्हा एक उतारा. 'बॉब आपलाही खेळ असाच एकतर्फी होता ना ? मीच लोभ केला. तुझ्याकडून करवून घेतला.' या लोभात कशाचे किल्मिश होते हे वरील विवेचनाद्वारे आपोआप स्पष्ट होणारे आहे.

हर्टाच्या व्यक्तिमत्त्वातील दुसऱ्या पैलूकडे वळू या. तो म्हणजे 'भान हरपून'टाकणारी विकृती तिच्यात आहे. घर उद्ध्वस्त झाल्यानंतर ती सडकेवरून जाते ती अवस्था. पोर्टसैद येथे बॉबबरोबर नसल्यामुळे भावनावेशात हाताला रक्त निघेपर्यंत घेतलेला चावा आणि बॉबच्या केबीनमध्ये विवस्त्र झाल्यानंतरची बेशुद्धी. या सर्वांचा विचार केला तर तिच्या मेंदूत काही तरी विकृती असावी असे वाटते.

आत्महत्येचे दोन तीन प्रयत्न तिने केलेले आहेत. अर्थात त्यात ती अयशस्वी झालेली आहे. तिच्या त्या अपयशानेच तर 'रणांगण' यशस्वी झाली. जिथे हर्टा आत्महत्येच्या प्रयत्नात यशस्वी होते, नेमकी तेथेच कादंबरीतील कथा एक अनावर हुंदका देते.

तिसरे व महत्त्वाचे वैशिष्ट्य; आत्महत्येचे मूळच म्हणू या—म्हणजे स्वतःच्या अधःपतित, अनैतिक जीवनाचा तिला आलेला उबग व त्यातून निर्माण होणारी असह्यतेची पोकळी. यातूनच तर तिच्या प्रेमाच्या त्या किल्मिशाची, मोहाची कल्पना स्पष्ट होते व हर्टा आत्महत्या करते ती का ? या प्रश्नाचा ससा पकडता येतो.

हर्टाशी बॉबचे जवळचे संबंध निर्माण होतात. फ्रान्झचा उल्लेख येताच तिचे आत्मनिवेदन सूचक आहे. बॉबबरोबर प्रेमाचे प्रत्यक्ष पाठ गिरविलेले असतातच. ती म्हणते, 'ऐकणार होतास म्हणून सांगितले. मला मोकळं बोलायला कुणी नाही.' मन जिवंत आहे. त्याला तहान लागते. भूक लागते. उपासमार कशी किती सोसायची ? नवे अनुभव येतात. मनाला हादरा बसतो एखादे वेळी वाटतं, आपल्या हातून काय होत आहे हे ! फ्रान्झ माझं सर्वस्व एकदा होता याची आठवण अजून आहे. पण आज सर्वस्वी तुझी आहे असं म्हणते. याला काही अर्थ आहे का ? "

ह्यातील प्रत्येक वाक्याचा अर्थ सुजाणपणे लक्षात घेणे आवश्यक आहे. एकनिष्ठ राहू शकत नाही याची कबुली आपल्या हातून काय होत आहे याची वाटणारी खंत. आज सर्वस्वी तुझी आहे असं म्हणते— म्हणजे तेही निश्चित नाही. शिवाय 'याला काही अर्थ आहे काय ?' हा प्रश्न तसाच लोंबकळत ठेवलेला आहे, हे विशेष.

पहिल्या प्रेमाच्या एकनिष्ठतेला पोचलेली ढळ तिला जाणवते. त्या प्रेमाशी केलेल्या प्रतारणेची कल्पना तिच्या मनात सतत सळसळत असते. सत्य प्रेमावर

विश्वास नसतो. ह्यातून एक प्रकारची उद्विग्नता तिला प्राप्त होते.

डेकवर हर्टा बॉबजवळ जाते. इतक्यात कुणी आल्याची जाणीव बॉब तिला करून देतो. त्यावेळी ती म्हणते, "....त्यांची नीती आहे. मी सगळचातून उठलेली. मला लोक नाहीत. कुठली नीती पाळायची सांग."

ह्याचे बॉबने काही उत्तर दिलेले नाही. आपणही उत्तर शोधण्याची धडपड करू नये. मूळ मुद्दा आपण नीतिबाह्य आचरण करीत आहोत याची तरळती छटा यातून व्यक्त होते. व क्षणिक सुखाच्या आवेगाची उर्मीच इतकी दाटून आलेली असते की नीती–नियमाची पायमल्ली क:पदार्थ वाटू लागतो.

वास्तविक घर सोडल्यापासून यहुद्यांना खाजगी जीवनच उरलेले नव्हते. याची स्पष्ट कल्पना काही प्रसंगांच्याद्वारे येते. शिवाय हर्टाला दुर्गुणी म्हणणारे कुणीच नाही. उलट जे काही संबंध त्यांच्यात आहेत त्याविषयी कुणाला विधिनिषेध वाटत नाही. इतर माणसे लालसेने पाहण्यात व जमल्यास हौस-मौज करण्यात धन्यता मानणारेच आहेत.

ही सर्व स्थिती असताना बॉब व हर्टाच्या मनात लोकलाज शिरतेच कशी ?

स्वत:च्या अध:पतनाची मळमळ तिने पुन्हा पत्रातून व्यक्त केली ती अशी, 'अशीच शिक्षा पाहिजे. मी पापी आहे. अपराधी आहे. तू कोण कुठला, हे माहीत नव्हते. आलास आणि गेलासही. पण तुझ्यावर प्रेम केले. जगाची लाज सोडली. मनाचीही अखेर झुगारून दिली. कार्लच्या प्रीतीचा गळा दावला. या पेक्षा काय अपराध करायचे ? मला हीच शिक्षा पाहिजे.'

या ठिकाणी 'या पेक्षा काय अपराध करायचे ?' यातील प्रश्नचिन्ह पुन्हा महत्त्वाचे. स्वत:च्या अपराधाची, पापाची जीवघेणी बोचणी कायम असल्याचे निदर्शकच नाही का ? आत्महत्येपूर्वीचे हे तिचे पत्र असल्याकारणाने त्यातून 'कबूली जबाब' व्यक्त केलेला असल्यामुळे त्याचा विचार केल्या जावा.

पुढे ती लिहिते, 'सुखी, सुरक्षित जीवनातल्या माझ्या भगिनी मला क्षमा करोत. बिचाऱ्या भाग्यवान आहेत. त्यांच्या प्रीतीचा ध्रुव अढळ राहतो. भक्तीचे दैवत भ्रष्ट होत नाही. निष्ठेला सातत्याचा वर लाभतो. मी स्त्रीच ना ! मी का बरे असे केले ?' पुन्हा प्रश्नचिन्ह हर्टाच्या भ्रष्टतेचा ठोस पुरावा आणखी कशाला हवा. आम्ही बायका थिल्लर मनाच्या असतो हे तिने आवर्जून सांगितले. 'कळायला लागल्यापासून मी पुष्कळदा आकर्षित झाले' हे तिचे आत्मचरित्र. अशा या उनाड मनेने शोधलेल्या आश्रयाचा गोपवारा दिलेला आहे.

हर्टाच्या या स्वभावातील इंग्लिश कळायला तिचेच आत्मनिरीक्षणात्मक उद्‌गार समर्थ आहेत. ती शेवटी लिहिते, 'पुष्कळदा वाटते, आम्ही बायका पुरुषांवर प्रेम करीत नाही. स्वत:च्या मनोधर्मावर करतो. आमच्या अपेक्षा असतात. आशा असतात. त्या पुऱ्या होतील असे दिसते, त्या स्थळावर आमचे लक्ष जाते. एखादे हरपले तर दुसरे त्याच जातीचे दिसेपर्यंत मन निपचित पडून राहते. दिसल्याबरोबर डोळे उघडून पाहते.'

कळायला लागल्यापासून हर्टाने बऱ्याच वेळा डोळे उघडून पाहिलेले आहे. आत्महत्या केली नसती तर बॉबनंतर दुसरे त्याच जातीचे तिला कुणी तरी भेटले असते. दुर्दैव मन्नानचे तो तसा रहात नाही.

बॉबला 'श्लाफेनजल मिदनांदर'चा अर्थ सांगण्यासाठी वरच्या वर्थवरून उतरताना तिला स्वत:च्या अध:पतनाची व अपराधाची जाणीव होते. तिची आई नेमकी त्यावेळी कूस बदलते व एक निश्वास टाकते. ह्या विश्वासाचा खरा अर्थ निरोधाचाच होता असे म्हणता येत नसले, तरी हर्टाला स्वत:च्या वाकडचा पडणाऱ्या पावलांचा ध्वनी स्पष्ट ऐकू आला हे निश्चित.

एकंदरीने हर्टाचे प्रत्यक्ष जीवन, तिच्या भावभावना, बॉबचे वाटणारे शारीरिक आकर्षण, स्वत:च्या अध:पतनाची जाणीव, प्रेमातील किल्मिशाचा दाह आणि अनावर असा भावनावेग या बरोबरच तिच्या निरपेक्षवृत्ती सुद्धा दुर्लक्षित होता कामा नये. बॉबचा रुमाल व त्याने देऊ केलेली ब्रॅन्डी, याचा ती स्वीकार करीत नाही. बॉबचे प्रेम खरेच आहे याची शाश्वती सुद्धा तीला रहात नाही. पत्रातून ती हे लिहिते, 'तुझे जर माझ्यावर प्रेम नव्हते, तर माझ्याशी लग्नाला तू का तयार झालास ? बॉब, निव्वळ दया येऊन ? बॉब. मला दया नको. आश्रयाचीसुद्धा गरज नाही'

बॉब लग्नाचा शिळा पोळा मान्य करतो हे हर्टाच्या पत्रावरून समजते. बॉबचे या विषयी मौन आहे. हे जसे खरे तसे हर्टाचे वरील उद्‌गार खरे मानणे भाग आहे. म्हणजेच खेळ रंगविण्यात तरबेज असणारा, वाघिणीच्या चाव्यासारखे अनेक व्रण शरीरावर असणारा, प्रहराची ओळख, घटकेची मैत्री आणि पळाची प्रीती मानणारा. प्रेम असते काय आणि वियोग झाला काय हर्टा मरणार नाही याची शाश्वती असणारा. बॉब हर्टावर खरेखुरे आत्यंतिक प्रेम करू शकेल हे खरे तरी वाटते का ? त्याने हर्टावर प्रेम असल्याचा उल्लेख एकदा केलेला आहे. पण तो खरा मानायचा का ?

हर्टाच्या कबूलीजबाबावरून तरी तसा विश्वास ठेवण्यास मन धजावत नाही. लिहिण्यापूर्वीची थोडी भावना, विवशता सोडल्यास बॉबच्या अंतःकरणात कधीच रणांगण माजलेले दिसत नाही. समुद्रात चहूकडे तेच पाणी दिसते. तेथे हे मागे गेले ते मागे गेले अशा परतीच्या खुणा रहात नाहीत. हे योग्य असले तरी मुंबईच्या हॉटेलमध्ये वसणाऱ्या बॉबच्या जीवन साग-रातील परतीच्या खुणा स्पष्टपणे दिसतात. तेथे हे आले व ते गेले असे निश्चित म्हणता येते.

ह्या खुणांनीच तर त्याच्या व हर्टाच्या अंतरंगाचा वेध घेता येतो व त्याच्यातील अस्सल संबंधाचा ससा हातात येतो. तो असा की बॉब आणि हर्टा यांच्यात खरे प्रेम नव्हते. जे आहे तो आभास आहे. परस्परांची व इतरांची त्यांनी केलेली ती फसवणूक आहे.

बॉब आणि हर्टा यांच्या मनोरचना सारख्याच आहेत. दोघेही स्वतःची दर्दभरी कहाणी आळवून, कारुण्याचे हुंदके देत परस्परांजवळ येतात. हर्टाने वाय-कांच्या प्रेमाचे गुपित उघड केलेलेच आहे. बॉब खेळाच्या दृष्टीने प्रेमाकडे पाहतो. फ्रान्समध्ये 'साहेबांना तरुण पोरीचे प्रेम पाहिजे' असा त्याचा ड्रायव्हर बॉबची अपेक्षा बोलून दाखवितो. बॉबची रसिकता, तिचा स्त्रीपूजेत होणारा कळस त्याने सांगितलेलाच आहे. हर्टा किंवा मार्था यांच्यात त्याला काही भेद वाटत नाही. ह्या सर्व गोष्टी विचारात घेतल्या म्हणजे त्याचे हर्टावर प्रेम नव्हते असे म्हणावेसे वाटते. हर्टाविषयी वाटणारी भावना एकच. ती म्हणजे 'दया'

हर्टाच्या अंतरंगाची विस्तारशः ओळख करून घेतलेलीच आहे. आपण एकनिष्ठेची शाश्वती हरवून बसल्याची खंत तिने जागोजाग प्रकट करून ठेवलेलीच आहे.

ह्या कादंबरीत प्रभावी भावना प्रेम ही नाही, हे आतापर्यंतच्या विवेचनावरून सिद्ध होते. प्रेमभावनेत असणारी अंतर्गत विसंगती व विरोधाच्या सशांना अशा प्रकारे पकडणे शक्य होते.

प्रेमभावना नाही तर मग ह्या कादंबरीत कोणते तत्त्व आहे की ज्या योगे ही कादंबरी आकर्षक झालेली आहे. याचा निर्णय घेण्यापूर्वी हर्टा व बॉब यांच्या स्वभाव वैशिष्ट्याचा परिचय करून घेतला जावा.

हर्टा आणि बॉब दोघेही प्रामाणिक आहेत. स्वतःला वाटणाऱ्या भावभावनांचे आंदोलन त्यांनी कोणताही आडपडदा न ठेवता समोर मांडले आहेत. दोघेही अलिप्त राहू इच्छिणारे, तरीही परस्परांकडे आकर्षित होणारे आहेत. प्रेमामुळे जसे ते एकत्र येत नाहीत, तसेच दुरावत नाहीत.

बॉब देखणा आहे. जातीवंत रसिक आहे. मुक्त आहे. हर्टा सुंदर आहे, स्वाभिमानी आहे, हट्टी आहे. बुद्धिमत्तेने तीव्र, भावनेची कोमल अशी आहे. जिद्द हे तिचे वैशिष्टय. ह्या जिद्दीच्या असीम ओढीनेच उपभोग-शून्य बॉबला ओढून धारेला लावते.

स्वतःच्या सौंदर्याविषयी, प्रेमाविषयी, परिस्थिती-विषयी, स्वतःच्या वृत्ती–प्रवृत्ती प्रमाणेच वायकांच्या स्वभावाविषयी, बॉबप्रमाणे इतर पुरुषांसंबंधी तिची एक निश्चित विचारसरणी आहे असे म्हणण्यापेक्षा या सर्वांचा ती डोळसपणे विचार करते हे तिची खरी आकर्षकताच आहे.

परिस्थितीच्या झंझावाताच्या आघाताने ती कोलमडते, लुळीपांगळी होते, तरी जिद्दीने त्यावर मात करण्यास भक्कमपणे उभे राहण्याचा सतत प्रयत्न करते.

बॉबवर प्रेम नसले तरी अखिल मानवजातीला सामावून उरणारी अपार सहानुभूती आहे. स्वतःच्या युद्धोत्पन्न वाताहतीची भीषणता जाणवणे व व्यक्त करणे हे सामान्य लक्षण. ते तिच्या ठिकाणी आहेच, पण देशादेशातील वैमनस्याच्या विक्राळ स्वरूपाने ती अधिक व्याकूळ होते. हे तिचे खरे असामान्यत्व. मन्नानला भारताविषयी द्वेष म्हणून त्याच्याशी लग्न केल्याने तिची मूलं बॉब या भारताविरुद्ध लढतील हा तिच्या मनात आलेला विचार चिन्त्य आहे.

स्त्रियांच्या सामर्थ्याविषयी तिच्या कल्पना अचाट आहेत. युद्ध आरंभणाऱ्या हिटलरविरुद्ध स्त्रियांनीच लढले पाहिजे. स्त्रियांचाच तो हक्क आहे. कारण सध्याच्या संस्कृतीने स्त्रियांशी उभा दावा मांडला आहे. राष्ट्राचे वैभव युद्ध. संहाराच्या सामर्थ्यावर अवलंबून असले, तरी स्त्रियांचे वैभव निर्मितीच्या सामर्थ्यावर माणसे जन्माला घालण्याच्या शक्तीवर आधारलेले आहे. अशा प्रकारची स्त्रियांच्या अस्मितेची, गौरवाची भावना असणारी हर्टा केवळ बॉवच्या प्रेमाच्या वियोगाच्या दु:खाने पोळून, जळून आत्महत्त्या करील हे शक्य नाही. यावर बॉवचा विश्वास असला, तरी तसा त्याने तो कोठेच प्रकट केला नाही. तरी पण त्याच्या मांडणीच्या धाटणीवरून तसे वाटणे संभवनीय आहे. खरेच आहे असे नव्हे. म्हणूनच तर 'रणांगण'च्या काही समीक्षकांची गफलत झाली.

हर्टाच्या आत्महत्त्येपूर्वी मानवत्वाची प्रतिष्ठा तिच्या डोळ्यापुढे तरळत असल्याचा पुरावा आहे. 'मला वाटते जगभर पसरलेले देशाभिमानाचे, संकुचित बंध तुटून जावे. नाझी तत्त्वज्ञान देशादेशातून फैलावले तर अल्पसंख्यांकांचे छळ होतील. ते देशोधडीला लागतील. हळूहळू अमुकच देश आपला अशी भावना त्यांच्या पुढच्या पिढीची उरणार नाही. जग हीच मानवजातीची मातृभूमी होईल.' अशी उच्च भावना असणारी हर्टा केवळ वैयक्तिक प्रेमाच्या यातनातून सुटण्यासाठी आत्महत्त्या करील यावर विश्वास बसत नाही. संकुचिततेचे बंध तिला असह्य होतात. विशालतेकडे, ऐक्याकडे तिचे मन पंख फैलावून झेपावण्याची मनिषा ठेवतात. ती आत्महत्त्या करते; पण चिरंतनत्त्वाच्या आकाशात स्वत:च्या अस्तित्वाची मंद प्रभा दिमाखाने कायम ठेवून जाते.

सारांश, बॉव-हर्टा यांच्या प्रेमभावनेतील विसंगती हर्टाचे दैदीप्यमान अशा प्रकारचे भरीव व्यक्तिमत्त्व. तिच्यामुळे कथानकाला आलेली गतीमत्ता यांचा विचार केला असता शिळया प्रेमाची रटाळ कथा सांगणे हे रणांगणचे कार्यच नाही. तर विकसनशीलता हे तिचे वैशिष्टच आहे अशा हर्टाच्या उध्वस्त जीवनाच्या भीषणतेला कारणीभूत होणाऱ्या 'रणांगणा'ची दाहकता चित्रित करणे हेच लेखकाचे उद्दिष्ट असावे.

महानुभाव आणि मराठी भाषा

– प्रा. यशवंत मनोहर

महाराष्ट्र संस्कृतीला एक नवे सामर्थ्य प्रदान करणाऱ्या चक्रधरांच्या वाणीमधून १३ व्या शतकामध्ये महानुभाव पंथ साकार झाला. तत्कालीन महाराष्ट्रीय सांस्कृतिक जीवनात हा पंथ विद्रोही ठरला. त्यामुळे तेव्हापासून आजपर्यंत महानुभाव पंथ पंथियेतरांमध्ये चिर उपेक्षेचाच विषय झालेला आहे. चक्रधरांचे जीवन, त्यांचे माहात्म्य आणि त्यांचे बलिदान इथे विनाकारणच उपेक्षित राहिले. तरीही ह्या पंथाचा प्रभाव महाराष्ट्रांत, त्याप्रमाणे महाराष्ट्राबाहेरही उत्तर हिंदुस्थानापर्यंत पडला होता हे आजही प्रत्ययाला येते. या पंथाने आपल्या वेगळ्या विचारधारेने आणि आचरशुचितेने महाराष्ट्राचे माहात्म्य वाढविले आणि मराठी भाषेला वैभवाच्या शिखरावर बसविले. महाराष्ट्रात त्याचकाळी आणि नंतर वारकरी संप्रदाय, समर्थ संप्रदाय यांसारखे संप्रदाय जन्माला आले. पण मराठी भाषा व साहित्याच्या दृष्टीने महानुभवांनी केलेली कामगिरी काही आगळ्या मोलाची ठरते. विरोध, उपहासाचा सासुरवास सहन करीत महानुभावांनी मराठी भाषेच्या संदर्भात केलेल्या कामगिरीला मराठी साहित्याच्या इतिहासात कुठेही तोड नाही असे निर्विवाद म्हणता येते. म्हणूनच महानुभाव पंथाने घडविलेला मराठी साहित्याचा इतिहास हा गौरवाच्या शब्दांनीच लिहावा लागेल.

१२ वे शतक मराठी साहित्याच्या इतिहासात सुवर्ण युग म्हणून गौरविलं जातं. कारण इथे नव्या जाणिवांचा मौलिक बहर आहे. ओसंडून वाहणाऱ्या उत्साहाचा हा काळ आहे. नव्या निष्ठा आणि प्रेरणांमधून जन्माला येणाऱ्या एका निरोगी समृद्धीचा हा काळ आहे. जणु मराठी साहित्यात हा वसंतऋतूचा काळ आहे. परंतु हे सुवर्णयुग घडविण्यामध्ये किंवा चैतन्याच्या उत्साहाचा वसंत–ऋतू मराठीत निर्माण करण्यामध्ये महानुभवांचा सिंहाचा वाटा आहे ही गोष्ट नजरेआड करता येत नाही. म्हणून महानुभवांनी मराठीसबंधी दाखविलेली आत्मियता आणि त्यांनी केलेले कार्य फार मोठे होते, असे यथार्थपणे म्हणता येईल. महानुभाव वाङ्मयात लक्षणीय असे वैचित्र्य आहे. हे वैचित्र्य जसे विषयाचे त्याप्रमाणे आकृतिबंधाचेही आहे. महानुभावांनी निर्माण केलेल्या ग्रंथांची संख्या ६०० भरेल असे कै. भावे लिहितात. ह्या एवढ्या अवाढव्य विस्तारात जसे अनेकविध पद्यग्रंथ आहेत तसे मराठीत प्रथमच निर्माण झालेले समर्थ असे गद्यग्रंथही आहेत. तेराव्या शतकामध्ये महानुभवांची प्रज्ञा आणि प्रतिभा बहरास आली होती. त्यामुळे मराठीच्या प्रारंभकाळीही ह्या पंथाने मराठीत श्रेष्ठ दर्जाचे साहित्य जन्माला घातले आणि मराठी भाषेचे वैभव वाढविले. या काळात लीळाचरित्रासारखा आदर्श चरित्रग्रंथ निर्माण करून महानुभावांनी चरित्रवाङ्मयाचा पाया घातला. तसेच सूत्रपाठ आणि 'दृष्टांतपाठा'सारखा न कळतच जन्माला आलेला पहिलावहिला कथाग्रंथ आपणास महानुभावांनीच दिला. मराठीतील प्रथम कवयित्रीचा मान मिळविणारी महदंबा याच पंथाने घडविली. पंचवार्तिक हे मराठीतील आद्य व्याकरण जसे महानुभावांनी लिहिले, तसे कोशवाङ्मय आणि मार्गप्रभाकरासारखा छंदशास्त्रविषयक ग्रंथही त्यांनी लिहिला पंचमहाकाव्याच्या तोलामोलाचे काव्यग्रंथ त्याप्रमाणे सूत्रपाठावरील भाष्ये महाभाष्ये पाहता तत्त्वज्ञानासारखे अवघड विषय पेलण्यास समर्थ अशी मराठी भाषा महानुभावांनी घडवली असे म्हणावे लागते. या लेखनात पंथप्रस्थापक व पूजनीय देवतांची चरित्रे, सूत्रवाङ्मय, यावरील समृद्ध टीकावाङ्मय, (देमाइसेची) पदे, न्याय, व्याकरण, कोशादी शास्त्रे, पंथमान्य क्षेत्रांची, व्यक्तींची महात्म्यवर्णने,

स्तोत्रे, तत्संबंधी काव्य असा विविध आणि विपुल साहित्य प्रपंच महानुभावांनी निर्माण केला. शिवाय या वाङ्मयात व्यापकता आहे तशी सरसताही आहे. सर्व महानुभवांजवळ भावनेची सश्रद्ध उत्कटता, प्रतिभेची उज्ज्वलता आणि ज्ञानाची समृद्धी होती. त्यामुळे प्रौढ, प्रसन्न व गोडव्याने फुलारलेली मराठी भाषा लिहिणारे महानुभाव हे मराठी वाङ्मयाचे मोठे शिल्पकार ठरले. मराठी भाषा, ही पांडित्य व शास्त्रविवेचनाच्या क्षेत्रात संस्कृतच्या थोडीही मागे राहू नये म्हणून किंवा बऱ्याचदा पंथीय दृष्टीकोनातून नवनिर्माणाचा यज्ञ मांडून महानुभवांनी हा वैशिष्टचपूर्ण असा विविध आणि विपुल ग्रंथसंग्रह निर्माण केला. प्राचीन मराठीत हे वैशिष्टच खास महानुभावांचे आहे.

महानुभावीय काव्यग्रंथांच्या भाषेत नजरेतून न सुटणारी एक प्रकारची सांकेतिकता व परभृतता आहे हे कुणीही मान्य करील. कारण त्या कवींपुढे संस्कृतातील काव्यशैलीचे नमुने तयार आहेत. महानुभावांच्या गद्यलेखनाला ही पार्श्वभूमी नाही. ह्या गद्याला आपली वाट स्वतंत्रपणेच शोधावी लागली. त्यामुळेच महानुभावांची गद्यरचना उत्स्फूर्त आणि खऱ्या अर्थाने स्वतंत्र होती. लीळाचरित्रासारखा उत्कृष्ट चरित्रग्रंथ, दृष्टांतपाठातील कथासाहित्य ह्या किंवा यासारख्या इतरही गद्यलेखनाचे आदर्श निर्माण करण्यामध्ये महानुभावांची प्रतिभा सफल झाली. ते आदर्श संस्कृतात तयार सापडणे शक्य नव्हते, तेव्हा अर्थातच या वाङ्मयाला पूर्वपरंपरा नाही. आणि महानुभावांनी नकळतच का होईना, पण काही लेखनादर्श मराठीत प्रथमच निर्माण केले. नव्या प्रेरणांच्या ताकदीमुळेच महानुभावांच्या वाङ्मयात विपुल वास्तवचित्रे, मानवी मनाची विस्मयकारक दर्शने, बोलीभाषेतील ताजे शब्दभांडार व अर्थवान वाक्प्रचार पाहायला मिळतात. आणि यांमुळेच जसे आशयदृष्ट्या तसेच अभिव्यक्ति–दृष्टचाही हे लेखन प्राचीन मराठीत अत्यंत मोलाचे ठरते. या लेखनात जशी सकसता आहे तशी व्यापकता आहे. आणि ज्या भाषेतून हे लेखन अवतरते त्या भाषेचा अल्पाक्षरत्व व अर्थभारत्व हा प्राणधर्म आहे. त्यामुळे पंथीय दृष्टीमधून निर्माण झाले असेल पण महानुभावांच्या गद्यलेखनात एकप्रकारचे मजेदार वाङ्मयत्व निर्माण झालेले आहे. प्रत्ययकारक रसाळपणा, मनमोहक माधुर्य जे महानुभावांच्या गद्यात सर्वभर दिसते ते नंतरच्या काळात वरचसे दुर्मिळच आहे. याप्रकारे वाङ्मयदृष्टचा भावदर्शी अशी अत्युत श्रीमंत भाषा महानुभावांच्या लेखनात दिसते. मराठीच्या प्रारंभकाळीच महानुभावांनी मराठीला प्रदान केलेली ही प्रौढता, आशयघनता व अवीट माधुर्य यांमुळे मराठी भाषा महानुभावांच्या अंगाखांद्यावर नवनवीन विभ्रम शिकली; साहित्यनिर्मितीसाठी लागणारी शक्ती मिळवून अंगोपांगी प्रौढत्वानं फुलारून आली असे औचित्यभंग न करता म्हणता येते.

महानुभावांनी मराठीच्या संदर्भात केलेली अधिक महत्वाची कामगिरी वेगळीच आहे. चक्रधर जन्माने गुजराथी खरेच पण ते एकदा महाराष्ट्रात आले आणि सर्वार्थाने महाराष्ट्री किंवा मऱ्हाटी झाले. ते मराठी भाषा अनावर म्हणजे अस्खलितपणे बोलत. या अशा संपन्न व्यक्तित्वाच्या चक्रधरांनी महाराष्ट्राला आपल्या धर्मभूमीचे माहात्म्य दिले आणि मराठीला धर्मभाषेची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. आणि अर्थातच सर्व महानुभावपंथीय मराठीत लिहूबोलू लागले. त्यांचा सर्व धार्मिक व्यवहार मराठीतूनच होऊ लागला. धर्मभाषा म्हणून मराठीला एक वेगळेच माहात्म्य, वेगळीच वंदनीयता प्राप्त झाली. एक वेगळीच आत्मीयता मराठीच्या संदर्भात महानुभाव पंथीयांमध्ये निर्माण झाली. मराठीच्या भवितव्याच्या दृष्टीने ही गोष्ट लाखमोलाची ठरली असल्यास नवल नाही. आणि ही सर्वच किमया 'महाराष्ट्री असावे' या चक्रधरांच्या सूत्राची आहे. या सूत्रावर भाष्य करताना आचारस्थळकारही म्हणतात. 'महंत राष्ट्र म्हणौनि महाराष्ट्र : महंत म्हणिजे थोर : धर्म सिद्धी जाय ते महाराष्ट्र : ' या प्रकारे महानुभावांमध्ये आणि चक्रधरामध्ये जसा महाराष्ट्र या आपल्या कर्मभूमीचा नितांत अभिमान होता तसे मराठी भाषेविषयीही उत्कट आणि अपरंपार प्रेम होते. शिवाय संस्कृत भाषेचे सखोल ज्ञान असूनही जनतेला जो उपदेश करायचा तो त्यांच्या भाषेमधूनच म्हणजे मराठीमधूनच केला पाहिजे ही जाणीव श्रीचक्रधरांना होती. म्हणून त्यांनी तत्कालीन लोकभाषेचा म्हणजेच मराठीचा अंगीकार केला ही एक पंथीय किंवा व्यावहारिक बाजू असली तरी त्यातून मराठीच्या साहित्यसंसाराला अमृताचा वर लाभला आणि मराठीला अपार माहात्म्य प्राप्त झाले हे सत्य आहे. मराठीतूनच बोलावे-लिहावे हा श्रीचक्रधरांचा आदर्श पुढीलांनी

परमश्रद्धेने समोर ठेवला. केशवराजसूरी यांनी एकदा 'उद्धरण संसरण' ही प्रकरणं संस्कृतात लिहिण्याची इच्छा नामदेवचार्याजवळ बोलून दाखविली तेव्हा नामदेवाचार्यांनी दिलेले उत्तर या गोष्टीवर मोठा प्रकाश टाकणारे आहे. नामदेवाचार्य म्हणाले, "नको गा : केशवदेया : येणे माझिये स्वामीचा सामान्य परिवारू नागवेल कीं : भणोनि केशवा संस्कृत सूत्रबद्ध प्रकरण न करी तूं की :" तसेच याच केशिराजांनी एकदा त्यांना संस्कृतात काही विचारले, त्यावर नामदेवाचार्य म्हणाले, "पंडिता केशवदेया : तुमचा अस्मात कस्मात मी नेणे गा : मज श्रीचक्रधरे निरूपिली मऱ्हाटी : तियाचि पुसा :" नामदेवाचार्यांचे हे दोन्ही उद्‌गार मोठे अर्थपूर्ण आणि सूचक आहेत. महानुभावांच्या वहुतेक ग्रंथांमधून मराठीचा हा सश्रब्द कैवार आणि जिव्हाळा ओथंवताना दिसतो. ही पोटतिडिक आणि उत्कटता प्राचीन मराठीत अपूर्व ठरावी इतकी संपन्न निश्चितच आहे. आणि धर्मभाषा म्हणून कुठल्याही भाषेला जी वंदनीयता व पावित्र्य प्राप्त होते ते सौभाग्य मराठीला महानुभावांमुळे मोठ्या वैभवशाली रूपात प्राप्त झाले. महानुभावाचे हे उपकार मराठीला विसरता येणे कठीण आहे. महानुभावांच्या अशा प्रेमळ सहवासात मराठीला बाळसे आले. ती मोठी झाली. समृद्ध झाली. शिवाय महानुभाव पंथावरोवर तिचा प्रसारही झाला. महानुभाव पंथ जियेजिये गेला तिथेतिथे मराठी ही धर्मभाषा म्हणून सावलीप्रमाणे गेली, मान्यता पावली, पूजनीय ठरली. पंजावात सारंगकोट, लाहोर, अमृतसर तसेच कित्येक लहान मोठी गावे आणि पेशावर, कावूल, कंदाहार शिवाय गुर्जर देश आणि मध्य हिंदुस्थानात इंदूर अशा कित्येक ठिकाणी या पंथाची कृष्णमंदिरे असून महानुभाव पंथाचा प्रभाव त्या भागात फार मोठ्या प्रमाणावर आहे. महत्त्वाची गोष्ट अशी की, ह्या सर्वच लोकांचे धर्मविधी मराठीमधून चालणे अपरिहार्य होते. आणि ते तसे चालतातही. तिकडील महंतांना, ठिकठिकाणी असलेल्या मठातील लोकांना मराठी अस्खलीत बोलता, लिहिता येते. कारण तिकडील या सर्वच लोकांना महानुभाव पंथाच्या स्वीकारावरोबर मराठीचा अंगीकार करावा लागला. महानुभावांमुळे मराठीला हा एवढा मोठा प्रदेश व्यापता आला. अविरतपणे परभाषीयांच्या ओठावर मोठ्या पवित्र रूपात विराजमान होता आले. ही गोष्ट मराठी भाषेच्या दृष्टीने अतीव मोलाची आहे यात वाद नाही.

महानुभाव पंथाने याप्रमाणे पंजाब पेशावरकडील यवनप्रधान व हिंसामय देशात मराठीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. मोठ्या डौलाने व अभिमानाने मराठी आजही तिकडे मिरवीत आहे. महाराष्ट्रातच नव्हे, तर सिंधूच्या पैलतीरापर्यंत मराठी ग्रंथांची, पाठांची स्तोत्रांची मोठ्या भक्तिभावाने, तन्मयतेने पारायणे होतात. १८ व्या शतकात राघो भरारीने शस्त्रबळावर मराठ्यांचा झेंडा सिंधूपार नेला; पण त्याची पाठ फिरताच ही शस्त्रनिर्मित सत्ता लोप पावली. पण ह्याहीपूर्वी पाचशे वर्षे प्रेम व अहिंसेच्या वळावर जो दिग्विजय महानुभवांनी केला त्याच्या खुणा सिंधूपार आजही आढळतात. आजही फार मोठ्या प्रमाणात महानुभाव पंथामुळे महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांना अन्यभाषिक आणि अन्यप्रांतीय परमश्रद्धेय मानतात. मानीत राहतील. मराठी भाषेच्या संदर्भातील महानुभावांनी केलेली ही कामगिरी आठवून मराठी भाषी माणसाला परमसंतोष आणि अभिमान वाटेल यात वाद नाही.

(नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने)

पुस्तक परीक्षण

—शं. बा. शास्त्री

१. घरगंगेच्या काठी
२. कल्याणी

लेखिका:–जोत्स्ना देवधर (१९६७) (१९६८)
प्रकाशक:–पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

ललित वाङ्मयाच्या क्षेत्रात 'कादंबरी' या वाङ्मय–प्रकाराला एक निश्चित आणि महत्त्वाचे स्थान आहे;–त्यातही, 'सामाजिक' म्हणून गणल्या जाणाऱ्या कादंबरीला अधिक महत्त्वपूर्ण मानले जाते.

प्रचलित समाज–व्यवस्थेचे, त्याच्या चाली–रीतींचे, समजुतींचे, धारणांचे आणि रूढींचे सूक्ष्म निरीक्षण करायचे आणि प्रचलित काळात या सर्व गोष्टी कितपत सुखकारक किंवा हितप्रद होऊ शकतात त्याचे परिणामकारक चित्र वाचकांच्या मनापुढे उभे करायचे, हा पूर्वीच्या सामाजिक कादंबऱ्यांचा उद्देश असे. आजच्या सामाजिक कादंबरीचे रूप, ती सामाजिक पार्श्वभूमीवर उभारलेली असली तरी, बरेचसे बदललेले आहे. आजची कादंबरी संपूर्ण समाज–जीवनाचे क्षेत्र सोडून काहीशा सीमित अशा कुटुंब–जीवनाकडे, आणि त्याच्याही पलीकडे जाऊन केवळ विवक्षित आणि विशिष्ट व्यक्तीच्या जीवनाकडे अधिक तादात्म्याने लक्ष देणारी बनलेली आढळते. व्यक्तीच्या अंतरंगात शिरून माणसाच्या स्वभाव–वैशिष्टयांची, त्याच्या भावना आणि विचारांच्या आंदोलनांची, सकृत्‌दर्शनी विचित्र आणि अनाकलनीय वाटणाऱ्या त्याच्या वर्तनाची गूढे समजूतदारपणाने उकलून दाखविणे आणि वाचकाला त्याच्या यथार्थ स्वरूपाची ओळख पटवून देणे हे आजच्या कादंबरीचे एक प्रमुख लक्षण आहे. ज्योत्स्ना देवधरांच्या 'घरगंगेच्या काठी' आणि 'कल्याणी' या दोन्ही कादंबऱ्या एकाच वर्गात मोडतात.

कादंबरी म्हटली म्हणजे तिथे संघर्ष आलाच. संघर्ष नसला तर कादंबरीच्या कथानकाला जोम चढत नाही, त्यात रंग भरत नाही, त्याला रूप येत नाही. या दोन्हींत संघर्ष आहेच. पण या संघर्षाचे रूप नीट लक्षात येण्यासाठी, आणि त्या अनुषंगाने लेखिकेने वाचकांपुढे मांडलेल्या कौटुंबिक चित्रांचे यथार्थत्व नीट समजून घेण्यासाठी दुसऱ्या काही गोष्टी विचारात घेणे आवश्यक आहे.

समाज–व्यवस्थेत जी स्थित्यंतरे होतात आणि त्या स्थित्यंतरांमुळे समाजाचे स्वरूप जे बदललेले दिसते, त्या स्थित्यंतरांना प्रगती म्हणायचे किंवा नाही, हा प्रश्न निराळा; पण स्थित्यंतरे होतात आणि समाज–व्यवस्थेची घडी नित्यश: बदलत असते ही गोष्ट मात्र खरी. हे बदल कसे होतात? एका विशिष्ट देश–काल–परिस्थितीला पोषक आणि सुखावह होतील अशा प्रकारचे काही विशिष्ट नीति–नियम, आचार–विचार प्रचलित झालेले असतात. त्या परिस्थितीत हा आचार–विचार समाजाला आणि त्यातील व्यक्तींनाही ग्राह्य वाटत असतो. त्यांचे पालन सरसहा सुरू असते व कालांतराने हेच आचार–विचार रूढींचे रूप धारण करून बसतात. पुढे कालमानाप्रमाणे समाजाची परिस्थिती अपरिहार्यपणे बदलत जाते, त्या बदललेल्या परिस्थितीला नव्या आचार–व्यवहाराची गरज उत्पन्न झालेली असते, पण रूढींच्या व परंपरेला धरून असणारी व्यवस्था समाजाच्या मानगुटीला बसलेलीच असते. या अवस्थेत व्यक्तीची कुचंबणा होते, तिचा कोंडमारा होतो, तिच्या जिवाचा तडफडाट होऊ लागतो, पण लाचारपणे माणसाला हे सर्व निमूटपणे सहन करून आपले आयुष्य कंठावे लागते. हा तडफडाट जेव्हा अधिकाधिक विस्तृत आणि विशाल बनू लागतो, तेव्हा मग त्याच्याविरुद्ध आवाज उठू लागतात आणि नव्या

दमाची नवी पिढी त्या रूढींच्या विरुद्ध बंड उभारून त्यांचा उच्छेद करण्यास उद्युक्त होते. अशा रीतीने शेवटी जुनी परंपरा नष्ट होते आणि तिची जागा नव्या आचार-व्यवहाराला प्राप्त होते. 'घरगंगेच्या काठी' या कादंबरीतील नायिका अशा प्रकारच्या बंडाचा झेंडा उभारणारी एक तेजस्वी स्त्री आहे.

सातपुत्यांचे घराणे श्रीमंतांचे, जुन्या खानदानीचे. सर्वात वडील भाऊ (गंगाधर) अण्णासाहेब हा घरचा कर्ता पुरुष. जुन्या परंपरेतल्या एकत्र कुटुंब पद्धतीला अनुसरून कर्त्या पुरुषाच्या स्वामित्वाचा सर्व दुरभिमान पुरेपूर अंगी भिनलेला. आणि या दुरभिमानाच्या जोडीला छद्मीपणा, नाटकीपणा आणि कावेबाजपणाही भरपूर प्रमाणात अंगी असलेला. या घरचा कर्ता पुरुष मी, येथे होणारी प्रत्येक लहान-मोठी गोष्ट व्हायची ती माझ्याच तंत्राने, माझ्याच मर्जीप्रमाणे व्हायला पाहिजे, तसे झाले नाही तर सातपुत्यांच्या घराण्याचे नाव बद्दू होईल, अशी त्याची प्रामाणिक समजूत, आणि त्या समजुतीच्या आड येणारी प्रत्येक गोष्ट अगदी निर्घृणपणे कापून काढणारा ! आणि अशा या दणकट अहंमन्यतेशी जन्मभर लढा देत राहावा लागला जानकीच्या सत्प्रवृत्त स्वाभिमानाला.

लग्न होऊन जानकीने सातपुत्यांच्या वाड्यात पाऊल ठेवले, आणि तेव्हापासूनच तिची आणि तिच्या धाकट्या दिराची गट्टी जमली. अंतूबद्दल तिच्या मनात अपार ममता, अननुभूत असा जिव्हाळा उत्पन्न झाला. दीर–भावजयीचे हे सीता–लक्ष्मणासारखे निरागस ममत्व, हे मनाचे जिव्हाळ्याचे नाते, रक्ताच्या नात्यापेक्षाही अधिक प्रभावी होते, आणि जानकीचे दुर्दैव असे की, नेमक्या या जिव्हाळ्यामधूनच तिच्या नशिबी लिहिलेल्या परवडीची सुरुवात झाली. दीर–भावजयीचे हे प्रेमळ नाते घरातल्या कर्त्या पुरुषाला मंजूर नव्हते. अशीच घटना जानकी तेथे येण्यापूर्वीही एकदा या घरात घडली होती. स्वतः गंगाधराच्या पत्नीनेही आपल्या धाकट्या दिराशी–जानकीच्या पतीशी–असेच जिव्हाळ्याचे नाते जोडले होते, आणि त्या पायी तिला पतीकडून कसा अनन्वित छळ सोसावा लागला होता, त्याची कहाणी जानकीला कळली आणि ती हवकूनच गेली. पण यात आपले किंवा अंतूभाऊजींचे चुकते तरी काय, या गोष्टीचा उलगडा तिला होईना. अंतूची तिच्यावर अनन्य भक्ती. आपल्या कल्याणाचे, आपल्या हिताचे, आपल्या आवडीचे आयुष्यात जर कोणी काही करू शकेल तर ती आपली वहिनीच, अशी त्याची मनोमन श्रद्धा. या त्याच्या श्रद्धेला आणि आपल्या वहिनीच्या कर्तृत्वावरील विश्वासाला वेळीच आवर घालावा अशा उद्देशाने गंगाधराने जानकीची आणि तिच्या नवऱ्याची शेतीच्या गावी रवानगी करून देण्याचा घाट घातला आणि तो आपल्या नाटकीपणाने यशस्वीही करून दाखविला. हुशार, सुशिक्षित, कर्तबगार, सर्वगुणसंपन्न अशी आपली धाकटी भावजय असली तरी काय झाले ? घरात वरचष्मा राहिला पाहिजे तो आपलाच,–या घरातल्या कर्त्या पुरुषाचाच, कारण असेच आजपर्यंत चालत आलेले आहे, ती परंपरा मोडणारी ही जानकी कोण ? अशी काहीशी भूमिका गंगाधराने या बाबतीत अंगीकारलेली आहे.

पुढे अंतूचा विलायतेला जाण्याचा प्रश्न उत्पन्न झाला. आपले चालू शिक्षण मधेच सोडून चित्रकलेचे शिक्षण घेण्यासाठी विलायतला जाण्याचा चालून आलेला हा योग,–पण त्यासाठी घरातल्या कर्त्या पुरुषाची परवानगी मागण्याची हिंमत अंतूला होईना. पण हा योग साधावा अशी इच्छा मात्र उत्कट. आपल्या सर्व इच्छा-आकांक्षा पूर्ण करून घेण्याचे एकमेव विश्वासाचे ठिकाण म्हणजे आपली वहिनी ! अंतूने साऱ्या गोष्टी तिला सांगितल्या, आणि तिनेही, होणारा सर्व विरोध जमेस धरूनही, अंतूला विलायतला पाठविण्याचा घाट घातला. त्यासाठी स्त्रीधन म्हणून जवळ असलेले आपले दागिनेही विकायला काढले. गंगाधराशी तिचे उघड उघड भांडण झाले. पण शेवटी तिला हार खावी लागली. अंतूचे विलायतला जाणे झाले नाही. तो खट्टू झाला, आणि जानकीची गंगाधराच्या अरेरावीबद्दलची चीड पराकोटीला गेली. जानकी चिडली, पण गंगाधराचा कर्तेपणाचा अभिमान सुखावला.

आणि पुढे तर कहरच झाला. अंतूने चक्क एका राजस्थानी मुलीशी लग्न करण्याचे ठरविले ! ना आपल्या जातीची, ना आपल्या धर्माची ! असेल श्रीमंताघरची म्हणून काय झाले ? असेल नक्षत्रासारखी देखणी, म्हणून तरी काय ? अंतूचे आणि तिचे एकमेकांवर अगदी जिवापाड प्रेम होते—कबूल, पण असल्या प्रेमाला काय चाटायचे आहे ? त्या मुलीच्या आई-बापांना तरी काय म्हणावे ? त्यांनी असल्या परजातीच्या माणसाशी लग्न करायला आपल्या मुलीला परवानगी कशी दिली,

भगवान जाणे ! पण त्यांनी 'हो' म्हटले तरी गंगाधराने ते कबूल करायला पाहिजे ना ! सातपुत्यांच्या घराण्याची अब्रू तो उघडचा डोळयांनी मातीत मिळालेली कशी पाहू शकणार ? त्यापेक्षा, प्राण गेलेला बेहेत्तर !

अंतूचा एकमात्र आधार म्हणजे त्याची वहिनी ! तिने सर्व गोष्टी ऐकून घेतल्या, समजून घेतल्या. त्या राजस्थानी मुलीशी भेटी-गाठी घेतल्या. हा विवाह घडून आला तर दोघेही खऱ्या अर्थाने सुखी होऊ शकतील हे तिच्या मनाला पटले, आणि वाटेल ते झाले तरी मी हा विवाह घडवून आणेनच, असा भरवसा तिने अंतूला दिला. आजपर्यंतचा ह्या घरातला सारा अनुभव जमेस धरूनही तिने अंतूला आणि त्या मुलीला निर्धाराने आश्वासन दिले.

पण इथेही तिला हारच खावी लागली. कर्त्या गंगाधराच्या छद्मीपणापुढे तिचे काही चालू शकले नाही. पोटचा मुलगा श्रीपाद मात्र गंगाधराच्या पावलावर पाऊल ठेवणारा निघाला याचे प्रत्यंतर पटून तिच्या मातृ-हृदयाने हाय खाल्ली ! त्या राजस्थानी मुलीने आत्महत्या करून घेतली. अंतूही परागंदा झाला आणि राजकीय चळवळीत सामील होऊन लष्करच्या जवानांच्या हातच्या गोळीला बळी पडला--पण सातपुत्यांच्या घराण्याची अब्रू शाबूत राहिली !

या धसक्याने जानकीची म्हातारी सासू वारली. जन्मभर आपल्या मोठ्या मुलाच्या काचात तिला जगावे लागले होते. घरात जे काही चालले आहे ते सर्व काही उघडचा डोळयांनी म्हातारी पाहात होती, पण मुलाविरुद्ध 'ब्र' काढण्याची सोय नव्हती. मरताना म्हातारीने आपल्या थोरल्या सुनेच्या मांडीवर मान टाकून प्राण सोडला; गंगाधराचा स्पर्शसुद्धा तिला नकोसा वाटत होता.

आईवर गंगाधरची अपार भक्ती; पण मरतेवेळचे तिचे हे वागणे त्याला असह्य झाले. आपण आयुष्यात जे काही करीत आलो त्यावद्दल त्याची त्यालाच आता लाज वाटू लागली. तो पार बदलला. आजपर्यंत साऱ्या घरात कर्दनकाळासारखा वर्चस्व गाजविणारा गंगाधर अगदी दुबळा, गरीब, शरमिंदा झाल्यासारखा बनला. तो बदलला, पार बदलला,– इतका की, तो जानकीलाच म्हणाला, 'अग, माझ्याबद्दल तू असं वाईट का वाटून घेतेस ? जानकी, मलाच अंतू मान, म्हणजे सारं काही ठीक होऊन जाईल !

घराण्याच्या अभिमानाने आक्रस्ताळया स्वभावाच्या, आपल्यापुढे दुसऱ्या कोणाच्याही भावनांना न जुमानणाऱ्या, घरातल्या प्रत्येक व्यक्तीचे जीवन अक्षरशः गुदमरून सोडणाऱ्या गंगाधराची अशी शोकांतिका आहे. हा त्याचा पराभव आहे. हा आपला पराभव, ही आपली चूक त्यानेही जाणली, ओळखली,— पण फार उशीरा !

ही एक शोकांतिका आहे, याचे दुसरेही एक कारण आहे. गंगाधराने आपला पराभव मान्य केला, जानकीचे श्रेष्ठत्व त्याला पटले, आपण घरातल्या सर्व व्यक्तींना अन्यायानेच वागविले आणि सर्वांच्या दुःखाला कारणीभूत झालो, हे त्याला वोचू लागले, केव्हा ?— जिच्यावर त्याची अनन्य भक्ती होती त्या त्याच्या आईनेच जेव्हा त्याचा अव्हेर केला, तेव्हा ! गंगाधराच्या स्वभावात जो बदल झाला तो काही जानकीच्या कर्तबगारीमुळे घडून आलेला नाही. घराण्याच्या अब्रूविषयी ज्या त्याच्या बुरसटलेल्या समजुती आहेत, त्यात काही कोठे तडा गेलेला दिसत नाही. त्या धारणा बदललेल्या आहेत असे कुठेच काही दिसत नाही. यात जानकीचा विजय नाही. तो दीन बनला, अगतिक बनला, याला कारण निराळे आहे. एका अर्थाने, कादंबरीच्या दृष्टीने हा जानकीचा पराजयच आहे. आणि म्हणून ही कादंबरी शोकांतिका आहे असे मला वाटते.

दुसरा एक विचार. कादंबरीतील पात्रांचे स्वभावचित्रण करताना लेखकाचे निरीक्षण, मनुष्य–स्वभावाबद्दलची सुजाणपणाची समजूत, ती पात्रे कशी काय वागताहेत यावद्दलची काहीशी त्रयस्थपणाची, अलिप्तपणाची भूमिका लेखकाने घ्यायला हवी असते. तसे जर झाले नाही तर काही पात्रांबद्दल लेखकाकडून काहीसा अन्यायही होणे शक्य असते. उदाहरणार्थ, गंगाधराच्या साऱ्या व्यवहाराला 'हृदयशून्य दुष्टपणा' असे लेखिका म्हणते. एका अर्थाने ते बरोबरही आहे. पण या सर्व दुष्ट व्यवहाराच्या मुळाशी गंगाधराच्या स्वभावातली कोणती प्रवृत्ती मुख्य होती ? त्याच्या समजुतीप्रमाणे घराण्याचे नाव बद्दू होऊ नये, हीच त्याची इच्छा. यासंबंधीच्या त्याच्या कल्पना, समजुती, धारणा, खुळचटपणाच्या, मूर्खपणाच्या असतील, पण

त्याला त्याच खऱ्या वाटत होत्या, आणि त्यासाठी तो आपल्या माणसांनाही दुःखाच्या खाईत लोटायला कचरत नव्हता, वेळप्रसंगी त्यासाठी तो वाटेल त्या भल्या–बुऱ्या मार्गाचे अवलंबन करायलाही मागेपुढे पाहत नव्हता. त्याच्या स्वभावातली ही बाजू अधिक चांगल्या प्रकारे रंगविली गेली असती, तर ही कादंबरी अधिक उठावदार झाली असती असे मला वाटते. पण कादंबरीचे रूप आत्म–कथनपर असल्याकारणाने हे तेवढेसे जमले नसावे.

कल्याणी

ज्योत्स्ना देवधरांची ही दुसरी कादंबरी. आकाराने पहिल्या कादंबरीपेक्षा थोडी मोठी, आणि आपल्या आंगच्या अभिजात साहित्यगुणांनीही मोठी.

ही कादंबरीही 'घरगंगेच्या काठी' सारखीच एका कुटुंबाची कहाणी आहे. भडकपणा काहीसा कमी झालेला असला तरी हृदयाचा ठाव घेण्याची हिची शक्ती तशीच विलक्षण आहे, ह्यात संशय नाही.

'घरगंगेच्या काठी' कादंबरीत संघर्षाचे स्वरूप जसे होते, त्यापेक्षा 'कल्याणी'मधील संघर्षाचे स्वरूप बरेचसे निराळे आहे. तेथे संघर्ष होता तो माणसामाणसांत. एका आततायी, अहंमन्य आणि छद्मी वृत्तीविरुद्ध एका सत्प्रवृत्त आणि बाणेदार वृत्तीला तेथे झगडावे लागले होते. ह्या ठिकाणी लढा देणारी नायिका कल्याणी तशीच तेजस्वी, बाणेदार, सत्प्रवृत्त मनाची तरुणी आहे, पण तिला झगडावे लागते आहे ते एका खुळचट, विचित्र अंधविश्वासाशी. गरिबाघरची ही देखणी मुलगी मामाच्या आश्रयाने बंगालच्या परिसरात लहानाची मोठी झाली, आणि लग्न होऊन गृहिणी बनली तीही मारवाडसारख्या दुसऱ्या एका पर-मुलखातच. तिचे सासरचे घराणे पिढीजाद श्रीमंतीचे. ह्या एकत्र कुटुंबात नांदणारे स्त्री-पुरुष तसे श्रीमंतांने प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या सुख-सोईंची वाण नसलेले व मनाचेही चांगले. पण त्या सर्वांच्या रोमा-रोमांत एक अंधश्रद्धा घर करून बसली होती. ह्या घरात गुणी माणसे अल्पायुषी ठरतात, सुना-लेकी आपले सौभाग्य गमावून पांढऱ्या फटफटीत कपाळाने कण्हत-कुंथत कसे तरी आयुष्य कंठतात, ह्या घराण्याला हा एक शापच आहे; असाच सर्वांचा विश्वास. त्यामुळे तरुण वयाचा वासुदेव एकसारखा लग्नाला नकारच देत राहतो. लग्न करून संसाराला लागणे म्हणजे आपले मरण आपण होऊन ओढवून घेणे आणि आपल्या पत्नीच्या नशीबी जन्माचे वैधव्याचे भोग लिहून ठेवणे, हा त्याचा ठाम विश्वास. त्यामुळे तो घरातल्या वृद्ध चुलत्याचा, आपल्या प्रिय आत्याचा, सर्वांचा आग्रह मोडून काढतो आणि लग्नाला नकार देतो. पण शेवटी त्याला त्यांच्या निग्रहापुढे नमते घ्यावे लागतेच, आणि तो कल्याणीशी विवाहबद्ध होण्यास तयार होतो. तयार होतो खरा, पण मनोमन एक पक्का निश्चय करून,——लग्नानंतर पहिल्याच रात्री तो आपल्या पत्नीला सांगून टाकतो, "कल्याणी, नीट ऐक. आमच्या घरात एकही सवाष्ण नाही. ह्या वाड्यात भरल्या कपाळाने कोणतीच बाई राहू शकत नाही. म्हणून सांगतो, माझा जीव जर तुला जगवायचा असेल तर सवाष्ण होण्याचा प्रयत्न तू करू नकोस म्हणजे तू सवाष्ण राहशील !"

असल्या शाप-उःशापांवर कल्याणीचा विश्वास नसतो, त्यावर विश्वास ठेवणे म्हणजे खुळचटपणा आहे असे तिला वाटते. पण वासुदेव तिला सांगून टाकतो, "तू अश्रद्ध आहेस, तुझी विचारसरणी मला पसंत नाही. आमची श्रद्धा एवढंच बळ उरलं आहे आमच्याजवळ."

लग्न झाल्या दिवसापासून बिचाऱ्या कल्याणीच्या संसाराची अशी परवड सुरू होते. लेखिकेने ह्या हृदयद्रावक घटनेचे दोनच सुटसुटीत वाक्यांत अत्यंत प्रभावयुक्त शब्दांत वर्णन केले आहे. "कल्याणीपुढे जन्माचे कोडे टाकून वासुदेव निघून गेला. कल्याणी बसल्या जागी मालवून गेली."

ह्या शापित घरात ज्याच्या सहवासात कल्याणीला आपले उभे आयुष्य घालवायचे, ती माणसेही आपापल्या दुर्दैवाच्या घाल्यामुळे पिचलेली, चेकाळलेली आणि बेताल. काशी ही कल्याणीची चुलत नणंद. तिच्याच वयाची पण विधवा. संसार-सुखाला हपापलेली, पण ते सुख दैवाने हिरावून नेल्यामुळे कासावीस झालेली. आप्पा, काका मनाचे चांगले, पण आपल्या स्वर्गस्थ पत्नीच्या स्मरण-चिंतनातच आपला सर्व काळ काढणारे, त्या स्मृतींच्या भावपूर्ण आधारावरच जिवंत असलेले. कल्याणीच्या दुःखाची त्यांना कल्पना आहे, पण आपणच तिच्या ह्या दुःखाला एकापरीने कारण झालो,

आणि आता आपल्या ह्या स्वरूपसुंदर गुणी मुनेचे दुःख दूर करण्याचा उपाय मात्र आपल्या हाती नाही, ह्या दुःसह जाणीवेने खचून गेलेले. विटलेल्या मनाची सावित्री, दुसरी विधवा चुलत सासू. द्वेषाने आणि मत्सराने धुमसत असलेली, आपल्या मुलीचे कल्याणीशी सूत जमते आहे असे पाहून तिचा जळफळाट होतो, आणि कुठे कशालाच काही आधार नसताना, "आमच्या घरात सख्खं-चुलत असं भांडण लावू नकोस" म्हणून निरागस कल्याणीवर तोहोमत आणणारी, इंदिरेच्या मनाने, कल्याणी म्हणजे "खालमुंडी पाताळधुंडी."

घराण्यातली पूर्वकथा कल्याणीने इमानी दामूच्या तोंडून ऐकल्या तेव्हा तर ती अधिकच चकित झाली. उमद्या स्वभावाचा कर्तबगार असा वासुदेवचा आजा, जन्मभर त्याला छळतच राहणारी आणि आपल्या सुनेचा व मुलाचाही छळ करणारी त्याची आजी, राजपूत स्त्रीशी लग्न करणारा वासुदेवचा बाप, त्याच्यावर एकनिष्ठपणे प्रेम करणारी पण शेवटी सुखाने देहार्पणाला तयार झालेली 'सती मा' देवकी, एकापेक्षा एक विचित्र आणि अघटित.

आणि याच घरात होता कल्याणीचा चुलत दीर मुकुंदा ! कॉलेजात जाणारा, पण कोणाचेच त्याच्याकडे लक्ष नाही म्हणून पार वाया गेलेला. या उडाणटप्पू वाह्यात मुलावरून तिला किती यातना सोसाव्या लागल्या, तिच्यावर किती कुभांडं रचली गेली; तिच्याविषयी तिच्या नवऱ्याचे आणि इतर लोकांचे मन कलुषित करण्याचे कसे आणि किती प्रयत्न झाले,— पण सतीचे वाण हाती घेतलेल्या कल्याणीने हे सर्व मुकाट्याने गिळले. घरातले दागिने चोरून पळून गेलेल्या मुकुंदाने ते प्रकरण अंगाबाहेर झोकून कल्याणीवरच डाव उलटविण्याचा प्रयत्न केला, तिचा हात धरण्याचा प्रयत्न केला असता आपले थोबाड रंगवून घेण्याचा जो अनुभव त्याने घेतलेला होता, त्याचा सूड उगविण्याचा त्याचा हा प्रयत्न !

या घरात कल्याणीला किती छळ सहन करावा लागला त्याला सीमा नाही. पण शेवटी तिची थोरवी सर्वांना पटली आणि शेवटी तीच जिंकली. घराण्याच्या शाप-उःशापाच्या वाता फोल ठरल्या. कल्याणीचा विजय झाला.

स्त्री-जीवनाचे असे मार्मिक आणि समर्थ दर्शन मराठी कादंबरीत क्वचितच पाहायला सापडते असे जर कोणी विधान केले तर ते चुकीचे ठरणार नाही. ज्योत्स्ना देवधरांच्या कादंबऱ्यांकडे पाहणाऱ्यांपैकी काहीजण याच कारणामुळे त्यांच्यावर 'शरच्चंद्राचे अनुकरण करणाऱ्या' म्हणून आरोप करतानाही मी ऐकले आहे. पण त्या आरोपात काही तथ्य आहे असे मला वाटत नाही. तऱ्हे-तऱ्हेच्या कुचंबणा होत असूनही अत्यंत कणखरपणाने व धीरोदात्त पद्धतीने त्या परिस्थितीला तोंड देणारी बाणेदार स्त्री, हा या दोन्ही लेखकांमध्ये समानधर्म आहे एवढेच. पण त्याचा अर्थ ज्योत्स्ना देवधरांनी शरच्चंद्रांचे अनुकरण केले असे म्हणणे असमंजसपणाचेच ठरेल. ज्योत्स्नाबाईंची प्रतिभा, त्यांची निरीक्षण-शक्ती, त्यांची व्यक्तिदर्शने, त्यांच्या कादंबऱ्यांतील आशय,—साऱ्याच गोष्टी खास त्यांच्या स्वतःच्याच आहेत. त्यात अनुकरणाचा प्रश्नच येत नाही.

जे विषयाविषयी तेच त्यांच्या भाषेविषयी आणि शैलीविषयीही. इतकी सोज्वळ, ओघवती आणि प्रभावपूर्ण भाषा-शैली फार क्वचित् वाचायला मिळते. मोजक्या चार-दोन शब्दात, अलंकारादिकांचा फाफटपसारा न मांडता व्यक्तीचे किंवा प्रसंगाचे किंवा मानसिक आंदोलनाचे चित्र समर्पकपणे उभे करू शकण्यात ज्योत्स्नाबाईंचा हातखंडा आहे. याची साक्ष त्यांच्या कादंबऱ्यातील पान अन् पान देईल. तशीच त्यांची सौंदर्यासक्तीही !

या दोन अत्युत्कृष्ट कादंबऱ्या लिहून ज्योत्स्ना देवधरांनी मराठी कादंबरीचे दालन खरोखरीच समृद्ध केले आहे असे मला वाटते.

पुस्तक परिचय

—चंद्रकांत कुळकर्णी

१
एकांकिका वाटचाल

संपा.–श्री. र. भिडे, व. दि. कुळकर्णी व भालबा केळकर
प्रकाशक–सोमैया पब्लिकेशन
मूल्य–सोळा रुपये

मराठी एकांकिकेच्या अभ्यासाशिवाय मराठी नाट्यवाङ्मय आणि रंगभूमी यांचा अभ्यास पूर्ण होऊच शकत नाही. परंतु दुर्दैवाने एकांकिकेच्या अभ्यासाची उपलब्ध साधने फारच थोडी आणि मर्यादित आहेत व जी आहेत तीही विखुरलेली ! मराठी एकांकिकेचे संकलन करण्याचे दोन प्रयत्न यापूर्वी मराठी साहित्यात झालेले आहेत. विजापूरचे प्रा. श्री. र. भिडे यांनी निवडक एकांकिका (१९६५), निवडक एकांकिका (१९६६) हे दोन प्रातिनिधिक एकांकिका संग्रह यापूर्वी प्रसिद्ध केले आहेत. प्रस्तुत 'एकांकिका वाटचाल' या पुस्तकाच्या द्वारे त्यांनी मराठी एकांकिकेची वाटचाल व प्रगतीचे टप्पे दाखविण्यासाठी त्यांनी श्रीलक्ष्मीनारायण कल्याण नाटक, सुरत्रीचातुर्यदर्शन प्रहसन (द. वा. जोगळेकर), सकाळचा अभ्यास (रा. ग. गडकरी), सुट्टी ! शाळेला सुट्टी ! ! (दिवाकर), सांवर (अनंत काणेकर), सदू आणि दादू (पु. ल. देशपांडे), वळी (विजय तेंडुलकर), बायकांत पुरुष लांबोडा (वसंत सबनीस), अबोल झाली सतार (पुरुषोत्तम दारव्हेकर), चक्र (विद्याधर पुंडलीक), रणमर्द (रत्नाकर मतकरी), अनाथ (वसुधा पाटील), सुलतान (महेश एलकुंचवार), कावळा आणि कावळी (जयवंत दळवी), पानिपतची पहाट (भालबा केळकर), माधवी एक – देणे (पु. शि. रेगे) या सोळा एकांकिका या संग्रहात संकलित केल्या आहेत. या संग्रहातील सर्व एकांकिकांचे लेखन स्वतंत्र आहे. आधारित, भाषांतरित किंवा रूपांतरित एकांकिकांचा समावेश न करण्याचे धोरण येथे संपादकाने स्वीकारलेले आहे. या संग्रहातील प्रत्येक एकांकिकेचे–साहित्य–स्वरूप आणि निर्मितीकल्पना स्पष्ट करणारा विवेचक अभ्यास शेवटी दिला आहे, हे या पुस्तकाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य. या संग्रहाचा आणखी एक विशेष सांगायला हवा, तो म्हणजे या संग्रहाला सुरवातीला असलेले तीन अभ्यासपूर्ण लेख. 'एकांकिका उद्‌गम आणि विकास', 'एकांकिका स्वरूप आणि सामर्थ्य', 'एकांकिका', काही अपेक्षा: या तीन लेखांमुळे एकांकिका या नाट्यप्रकाराचा सर्वांगीण अभ्यास या ग्रंथाद्वारा होण्यास मदत झाली आहे. पाश्चिमात्य एकांकिकांसंबंधी विवेचनात्मक माहिती देणारा लेखही या संग्रहाच्या शेवटी जोडण्यात आला आहे.

मराठीतील एकांकिका या वाङ्मयप्रकाराचा साकल्याने व साक्षेपाने आढावा घेणारा पहिला संदर्भ ग्रंथ संपादित केल्याबद्दल संपादक मंडळाचे हार्दिक अभिनंदन.

२
पथिक–भाग तिसरा

लेखक– न. वि. गाडगीळ
प्रकाशक– व्हीनस प्रकाशन, पुणे
मूल्य–रुपये चार

१९५३ साली दसऱ्याच्या दिवशी काकासाहेब गाडगीळ ग्वाल्हेरला होते. त्या रात्री जीवन संपेपर्यंत काय लिहावयाचे याचा आराखडा त्यांनी रचला आणि

(पुढील मजकूर पान ४० वर)

हिरवा चारा आणि इतर कविता*

समीक्षक : भास्कर नंदनवार,

भंडारा जिल्ह्याचा प्रदेश कवी कालिदास, मराठीचे आद्यकवी मुकुंदराज व संस्कृत नाटककार भवभूती यांच्या पदरजांनी पुनीत झाला आहे. अशा भंडारा जिल्ह्यातील श्री. भास्करराव पांढरीपांडे यांचा हा दुसरा, पण पहिलेपणाच्या खुणा मिरवणारा काव्य-संग्रह ! १९५६ साली या संग्रहाला मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेने ५०० रु. चे प्रथम पारितोषिक देऊन गौरविले, हे या ठिकाणी मुद्दाम उल्लेखनीय. या संग्रहातील काही कविता अभिरुची, सत्यकथा, वाङ्मयशोभा, युगवाणी, रोहिणी, स्त्री, महाद्वार, तरुण भारत आणि लोकवाणी या मासिकांतून आणि वृत्तपत्रांतून वाचकांच्यापुढे अगोदरच आल्या आहेत.

या संग्रहातील कविता कालानुक्रमे संग्रहित केल्या असाव्यात, असे वाटते. कारण, त्यांच्या प्रत्येक पुढच्या कवितेत कल्पनेतील; किंबहुना, रचनेतील सफाईदारपणा प्रत्ययास येतो. काही कवितांवर केशवसुतांची छाप आहे. कवीने फक्त विभिन्न प्रकारचे भाव आणि विचार चित्रित करण्याचाच प्रामाणिक प्रयत्न केला नसून, निसर्ग आणि राष्ट्रभक्ती यांनाही त्यांनी आपल्या कवितांत महत्त्वाचे स्थान दिले आहे. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास भाव, भक्ती, जीवननिष्ठा आणि समता यांचा ऊर्जस्वल संगम या काव्यात झाला आहे.

कवीचे निसर्गप्रेम हिरवा चारा, पाठशाळा, मुशाफर, अभेद्य छाती, गूढ कोडे, विशाल डोह, इ. कवितांत आढळते. झुळुकेस पाहून सहज सुचलेल्या कवितेत —

घुम्या पर्वताची गुपिते काढाया ।
दऱ्याकपारीत मारिशी तू फेऱ्या ।।

असे म्हणतात, तर "वाटेवरती खडा आडवा, परिस्थितीचा प्रचंड डोंगर । अभेद्य छाती फोडुनि जाते, पुढचे पडते पाऊल बेडर" अशा कणखर शब्दांत 'अभेद्य छाती' या कवितेत आत्मविश्वासाचा अदम्य निर्धारही व्यक्त करतात. काही कविता जीवनाच्या संकेतदर्शक झाल्या आहेत. 'कुंकवाच्या धन्याला' जीवापाड जपणाऱ्या स्त्रीलाही यात मानाचे स्थान आहे.

